|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

TM Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : ११ अंक : ४६ सोमवार दि. ०६ नोव्हेंबर २०२३ ते रविवार दि. १२ नोव्हेंबर २०२३ पाने : ८ किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड


## अनैतिक नात्यात वितुष्ट आले प्रियकराने प्रेयसीला ठार केले

भिवंडी/क्राईम रिपोर्टर

विवाहित पुरुष असो किंवा महिला घर संसार असताना अनैतिक संबंध ठेवणे म्हणजे स्वतःचे आयुष्य स्वतःच उध्वस्त करून घेण्यासारखे आहे. कारण अनैतिक संबंध सहसा लपून रहात नाहीत आणि जेंव्हा ते उघडकीस येतात तेंव्हा समाजात बदनामी तर होतेच पण संसारही उध्वस्त होतात. मुळात अशा नात्यांना भवितव्य नसते. भिवंडीत अनैतिक संबंधात असलेल्या प्रियकर - प्रेयसीत भांडण झाले. तिने संबंध तोडून टाकले. त्यामुळे चिडलेल्या ...पान २ वर

## जेवण दिले नाही म्हणून त्याचे पित्त खवळले जन्मदात्या आईला मुलानेच जीवंत जाळले



अलिबाग/क्राईम रिपोर्टर

कोकणी माणूस तसा शांतता प्रिय म्हणून ओळखला जायचा. पण आता कोकणी माणसाची ती ओळख पुसून गेली कि काय असा प्रश्न निर्माण झाला आहे. कारण रक्ताच्या नात्याला काळिमा फासणाऱ्या एकापाठोपाठ एक अशा दोन घटना अलिबाग तालुक्यात घडल्या आहेत. नोकरी वाचवण्यासाठी दोन बहिणींना भावानेच विष देऊन ठार मारल्याची घटना अलिबाग तालुक्यातील चोळभोवळे गावात घडली होती. ही घटना ताजी असतानाच अलिबाग तालुक्यात रक्ताच्या नात्याला कलंक लावणारी आणखी एक भयंकर घटना घडली आहे. सुडकोली नवखार या गावात जेवण दिले नाही म्हणून एका उच्च शिक्षित मुलाने जन्मदात्या आईला जिवंत जाळून मारले. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. पण या अशा घटना का घडतात? रागाच्या भारत माणसाला रक्ताच्या नात्याचीही ओळख का राहत नाही. जयेश खोत हा आयटी इंजिनियर होता. पण बेरोजगार असल्याने मानसिक दृष्ट्या अस्वस्थ होता. आजकाल मुलांना चांगले शिक्षण घेऊनही नोकरी मिळत नाही, त्यातच कुटुंबियांकडून अशा बेरोजगार तरुणांची हेटाळणी सुरु होते आणि त्याचाच परिणाम या तरुणांच्या मनावर होतो आणि मग ते मागचा पुढचा जराही विचार न करता आपल्या संतापला वाट मोकळी करून देतात. पण त्यात त्यांचेच नुकसान होते. आता आईही गेली आणि आयुष्यही उध्वस्त झाले. माणूस किती जरी संकटात असला तरी त्याने रागावर नियंत्रण ठेवायला हवे. त्याच बरोबर आपल्या कुटुंबातील लोकांशी आपले रक्ताचे नाते आहे याची जाणीव ठेवायला हवी. ज्या आईने आपल्याला ९ महिने उदरात वाढवले, त्यानंतर काबाडकष्ट करून लहानाचे मोठे केले. शिक्षण दिले, स्वतःच्या पायावर उभे राहण्याइतके सक्षम केले, त्या जन्मदात्या मुलीचा जीव घेण्याचा विचार तरी त्याच्या मनात कसा आला. पण आजकालच्या मुलांना आई-वडिलांच्या उपकारांची जाणीव नसते. आपल्या मुलाने चांगल्या मार्गाला लागावे या भावनेतून भलेही आई-वडिलांनी मुलांना समजुतीच्या चार गोष्टी सांगितल्या तर त्याचा राग कसला. पण आजकालच्या स्वार्थी तरुणीला स्वतः पलीकडे काहीच दिसत नाही म्हणूनच रक्ताच्या नात्याचा विसर पडतो आणि त्यांच्या हातून अशा अघोरी घटना घडतात.

जन्मदात्या आईलाच जिवंत जाळून संपवल्याची संतापजनक व धक्कादायक घटना घडली आहे. आईकडे जेवण मागितले ते दिले नाही या रागातून या उच्चशिक्षित तरुणाने हे संतापजनक कृत्य केले आहे. अलिबाग तालुक्यातील सुडकोली नवखार येथे ही घटना घडली आहे. आयटी मधून शिक्षण घेतलेल्या उच्चशिक्षित जयेश खोत या युवकाने जन्मदात्या आईचाच खून करून मायलेकाच्या नात्यालाच कलंक लावला आहे. आई चांगुणा खोत हिचा अत्यंत निर्दयीपणे खून केला आहे. जयेश खोत उच्चशिक्षित आहे. परंतु या तरुणाला नोकरी नसल्याने कधी हॉटेलमध्ये तर कधी खेकडा पकडून विकणे असे मिळेल ते काम तो करत होता. मंगळवारी रात्री दहाच्या सुमारास आईने जेवण दिले नाही म्हणून किरकोळ वाद झाला. तसेच दोघांमध्ये शाब्दिक चकमक झाली. यावेळी रागाच्या भरात जयेशने लाकडी दांडक्याने आईला मारहाण करण्यास सुरुवात केली. त्यानंतर कोयत्याने मारत त्याने आपल्या आईला घराबाहेर अंगणात आणले. आईला कोयत्याचा धाक दाखवून तिच्यावरती पालापाचोळा टाकून तिला जिवंत जाळले. ...पान २ वर



आरोपी

## ओळखीच्याकडे चहासाठी जाऊन फसली दागिन्यांमुळे सुग्राबी जीव गमावून बसली





मुंबई/क्राईम रिपोर्टर

मुंबई सारख्या शहरात गुन्हेगारांचा चोरणाचा सूळसुळात असल्याने कुणीही मौल्यवान दागिने घालून फिरणे धोकादायक आहे. कारण दागिन्यांचा मोह सर्वानाच असतो. कधी कधी ओळखीची माणसेही दागिन्याच्या मोहापायी माणसाचा घात करतात वडाळ्यात अंगावर दागिने घालून फिरण्याची हौस असलेल्या एका वृद्ध महिलेला या हौसेमुळेच जीव गमवावा लागला. कारण एका ओळखीच्या इसमाची नजर तिच्यावर पडली. त्याने तिला गोड बोलून आपल्या घरी चहाला बोलावले आणि तिची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

एका जेष्ठ महिलेला सोन्याचे दागिने घातलेले पाहून आरोपीने तिला चहासाठी बोलावले आणि नंतर तिची आपल्या घरात हत्या केली. त्यानंतर या जेष्ठ नागरीक महिलेची जाळुन निघुर्णपणे हत्या केली.मात्र पोलिसांनी या आरोपीच्या मुसक्या आवळून त्यास गजाआड केले. दिनांक २६ आक्टोबर २०२३ रोजी १२:१५ वा चे सुमारास श्रीकांत सुदाम सोनावले (वय ४७) हे बी.पी.टी. रेल्वे स्टेशन इंचार्ज ट्रॅक एक्झामिन करीत असताना,त्यांच्या निरदर्शनास आले की, रेल्वे बी.पी.टी. गेट नं. ४ व ५ चे मध्ये ओव्हर हेड इलेक्ट्रीक वायर, एम.बी.पी.टी. क्र. १४९ ते १५० मध्ये, चिध्वी गल्ली, डॉ. चित्रांगण बुट्टा यांचे दवाखान्याचे मागे, वडाळा (पुर्व) या ठिकाणी अंदाजे ३५ ते ५० वर्षे वयाची अनोळखी महिलेचा मतृदेह अर्धवट जळालेल्या अवस्थेत दिसून आला. त्यामुळे त्यांनी लगेच या घटनेची माहिती वडाळा पोलिसांना दिली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन मृतदेहाची पाहणी करून घटनास्थळाचा पंचनामा केला. फिर्यादी श्रीकांत सोनावले यांनी दिलेल्या तक्रारीवरून वडाळा पोलीस ठाणेस गु.र.क्र. १९१/२३, कलम ३०२, २०१ भा.दं. वि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. गुन्हयाच्या तपासाच्या अनुषंगाने पोलीस उप आयुक्त संजय लाटकर ,सहाय्यक पोलीस आयुक्त विजय भिसे, वपोनि. मिलींद जाधव यांचे देखरेखीमध्ये पो.नि. गुन्हे, विकास म्हामुणकर, स.पो.नि प्रसाद शेकदार, पोलीस उप निरीक्षक, अमृता गारूळे, पोलीस उप निरीक्षक, प्रशांत रणवरे व शरद खाटमोडे, ...पान २ वर

## नोकरीवरून काढल्याने ड्रायव्हर भयंकर चिडला मालकावरचा राग त्याने मालकिणीवरच काढला

हातकणंगले/क्राईम रिपोर्टर



मयत सुषमा

नोकरी हे माणसाच्या उपजीविकेचे प्रमुख साधन असते. अशावेळी नोकराला मालकाने कामावरून काढून टाकले कि त्याच्या मनात संतापाची आणि सुडाची भावना निर्माण होती. पण ज्याच्यावर सूड उगवायचा तो सापडला नाही कि मग त्याचा राग त्याच्या नातेवाईकावर काढला जातो. एका कोल्हापूर जिल्ह्याच्या घुणकी गावातील अशाच एका घटनेत मालकाने कामावरून काढून टाकल्याने चिडलेल्या ड्रायव्हरने मालकाचा राग त्याच्या बायकोवर काढला आणि तिची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.



अशोक सनदे हे घुणकी गावातील कष्टाळू शेतकरी म्हणून परिचित होते. त्यांनी अत्यंत प्रतिकुल परिस्थीतीत पत्नी सुषमा बरोबर काबाड कष्ट करीत ऊस तोड वाहतुकीचा व्यवसाय सुरू केला. घरची थोडी फार शेती असल्याने त्यावर त्याचा घर प्रंपच चालत होता. त्याची दोन्ही मुले आता मोठी झाली होती. सुरूवातील सनदे पती पत्नी दोघेच स्वतःच्या बैलगाडीतून ऊस तोड करून वाहतुक करीत होते. हळू हळू त्याचा या व्यवसायात जम बसल्यावर त्यांनी ऊस तोड वाहतुकीसाठी एक टॅक्टर घेतला. त्या टॅक्टरवर ड्रायव्हर म्हणून त्यांनी नाशिक जिल्हयातील सुनिल जाधव याला ठेवले होते. गेल्या चार पाच वर्षापासून सुनिल जाधव हा सनदे याच्याकडे ड्रायव्हर म्हणून काम करू लागला. ऊस तोड वाहतुकीबरोबरच सनदे यांनी घरासाठी तीन चार जनवारे घेतली होती. त्याचा चारा पाणी दुध दुपते या सुषमा बघत ...पान २ वर

## कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ ठरला दारूच्या नशेत आईचाच गळा चिरला

कागल/क्राईम रिपोर्टर



मयत सुनिता

माणसाला एकदा का दारूचे व्यासन लागले कि मग त्याला कामधंदा सोडून घरात बसून फुकटचे खायची सवय लागते. असा माणूस कुटुंबासाठी डोकेदुःखी ठरलेला असतो. अशा स्थितीत त्याचा योग्यवेळी बंदोबस्त केला नाही तर दारूच्या नशेत त्याच्या हातून काहीही घडू शकते. कागल तालुक्याच्या वंदूर गावातील निलेश हा सुद्धा तसाच होता. काम धंदा न करता आईच्या जीवावर बसून खायचा. आई बिचारी दुसऱ्याच्या शेतात मजुरी करायची. तर तिचे मजुरीचे पैसे घेऊन निलेश दारू प्यायचा त्यावरून दोघांमध्ये भांडणे व्हायची. एके दिवशी दारूसाठी पैसे मागणाऱ्या निलेशला आईने चांगलेच धारेवर धरले. त्यामुळे चिडलेल्या निलेशने दारूच्या नशेत आईची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी निलेशला अटक केली आहे.



कागल तालुक्यातील वंदुर येथे वाईंगडे मळयात श्रीमती सुनिता वाईंगडे या आपला मुलगा निलेश याच्यासह राहयला आहेत. त्याच्या पतीचे अशोक वाईगडे याचे गेल्या २० वर्षापूर्वी निधन झाले आहे. त्यावेळेपासून सुनिता या दुसऱ्याच्या शेतात मोलमजुरी करून आपल्या संसाराचा गाडा एकटीने हाकत आहे. घरची परिस्थीती ही तशी बिकटच. दारिद्रय तर पाचवीलाच पुजलेले तरी ही त्याचा मुलगा निलेश हा कोणताही कामधंदा करीत नव्हता. अलिकडच्या चार पाच वर्षात त्याला दारू पिण्याचे व्यसन लागलेले होते. खरे तर या आधी निलेश हा ऊस तोड मजुरीचे काम करीत होता. ऊस तोड हंगामात त्याच्या हाताला काम असत होते. इतर वेळी तो आपल्या दारूच्या व्यसनापुरते मिळाले तरच काम करीत होता नाही मिळाले ...पान २ वर

## नात्यातल्या मुलीशी प्रेम सहन नाही झाले मामाच्या मुलाने अखेर रोशनला ठार केले



मयत रोशन

नाशिक/क्राईम रिपोर्टर

आजकाल प्रेम प्रकरणातून वाद निर्माण होऊ लागलेत आणि हे वाद एखाद्याच्या प्राणावरही बेतू लागलेत. एकाच मुलीवर दोघांचे प्रेम असणे किंवा आपल्या नात्यातील मुलीच्या प्रेमाला नातेवाईकांनी विरोध करणे अशा घटनांमधून झालेल्या वादाचे पुढे राडेबाजीत रुपांतर होऊन एखाद्याचा जीवही जाऊ शकतो. निफाड तालुक्यातील वडाळा गावात अशाच एका घटनेत नातेवाईकाच्या मुलीशी प्रेमसंबंध ठेवले म्हणून एका तरुणाने आपल्या आत्येभावाची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

नाशिक जिल्ह्यातील निफाड तालुक्यातील वडाळा येथे ज्ञानेश्वर मुरलीधर झाल्टे हे आपल्या परिवासमवेत रहातात. शेतीचा व्यवसाय करून ते आपल्या कुटुंबाचे पालनपोषण करतात. त्यांना अतुल आणि रोशन नावाची दोन मुले होती. अतुल हा एअरलाइन हॉटेल मॅनेजमेंट अकॅडमी नाशिक येथे हॉटेल मॅनेजमेंटचा कोर्स करत आहे. तर दुसरा मुलगा रोशन याने इलेक्ट्रिक मोटर रिवायडींगचा कोर्स आयटीआयमध्ये केला होता. तो निफाड येथील बाळासाहेब कोष्टी यांच्या दुकानात मोटर रिवायडींगचे काम करत होता, तसेच शेतात नादुरुस्त झालेल्या मोटरही तो दुरूस्त करून देतो. एकूणच रोशन हा झाल्टे कुटुंबीयांचा आधार होता. मंगळवार दि. १७ ऑक्टोबर २०२३ रोजी रोशन आवरा-आवर करून दुकानात जाण्यासाठी बाहेर पडला. सकाळी नऊ वाजता तो घरातून बाहेर पडला, पण रात्री उशीर झाला तरी तो परतला नाही. दररोज वेळेवर येणारा आपला मुलगा अजून कसा आला नाही म्हणून त्याच्या घरच्या लोकांनी रोशनच्या मोबाईलवर फोन लावून पाहिला, पण तो बंद लागत होता. रोशनचा फोन लागत नसल्याने त्याच्या घरच्या लोकांनी दुकान ...पान ६ वर

## पती पत्नीच्या भांडणात आई मधे पडली मुलानेच तिच्या आयुष्याची दोरी तोडली




अमरावती/क्राईम रिपोर्टर

आजकाल माणसाला पटकन राग येतो आणि रागाच्या भरात त्याच्या हातून काहीही घडू शकते. अशावेळी माणूस नात्या गोत्याचाही विचार करीत नाही. अमरावतीच्या गाडगे बाबा नगरात एका तरुणाचे जेवणात भाजी केली नाही म्हणून पत्नी बरोबर भांडण झाले. या भांडणात तो पत्नीला मारहाण करीत असताना त्याची आईमध्ये पडली म्हणून त्याने रागाच्या भरात आईची हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सीताकौर रमेशसिंग बावरी (५०) रा. गाडगेनगर असे मृतक तर नरसिंग रमेशसिंग बावरी (३५) रा. गाडगेनगर असे आरोपीचे नाव आहे. नरसिंग हा पत्नी रजनी (२८) यांना नेहमी मद्यप्राशन करून छोट्या-मोठ्या ...पान ६ वर

## दस्तगीर खाटिकचा मुलगा सुडाने पेटला २५ वर्षांनी बापाच्या खुनाचा बदला घेतला



मयत दिलीप

जळगाव/क्राईम रिपोर्टर

पूर्वी हिंदी सिनेमात खून का बदल खून असा एक प्रकार असायचा. खास करून आई-वडिलांच्या खुनाचा बदला मोठेपणी मुलगा कसा घेतो हे दाखवले जायचे. महानायक अमिताभचे भाग्य उजळणाऱ्या प्रकाश मेहेरा यांचा जंजीर हा चित्रपट सुद्धा असाच होता आणि तो तुफान चालला. त्यानंतर बापाच्या खुनाचा बदला घेणारी स्टोरी असलेल्या चित्रपटांची लाट आली होती. अशीच एक सुडाची घटना भुसावळमध्ये घडली आहे. २५ वर्षापूर्वी दस्तगीर खाटिक नावाच्या इसमाची हत्या झाली होती. दस्तगीरचा मुलगा तेंव्हा छोटा होता. मात्र २५ वर्षांनी त्याने बापाच्या हत्येचा सूड घेतला व दस्तगीरचा खून करणाऱ्या दिलीप जोनवाल याला चुलत्याच्या मदतीने ठार मारले. या प्रकरणी पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे.

खून का बदला खून या धर्तीवर जळगाव जिल्ह्याच्या भुसावळ शहरात यापुर्वी काही खून झाले आहेत. गेल्या काही दिवसांपुर्वी अशीच खून का बदला खून स्वरुपातील खूनाची घटना समोर आली. सुमारे पंचवीस वर्षापुर्वी पाच वर्षाच्या बालकाने आपल्या पित्याचा खून झाल्याची घटना पाहिली होती. त्यावेळचा पाच वर्षाचा बालक आता तिस वर्षाचा तरुण झाला. त्यावेळच्या तरुण मारेकरी व्हिलनने आता वयाची पन्नाशी पार केली ...पान ६ वर



06 TO 12 NOVEMBER 2023 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 11/4/2023 10:08 PM Page 1



पान १ वरून...

## अनैतिक नात्यात वितुष्ट आले...

प्रियकराने प्रेयसीची हत्या केली. भिवंडी सारख्या औद्योगिक नगरीत मोठ्या प्रमाणावर मजुरांच्या वस्त्या आहेत. कामधंद्याच्या निमित्ताने एकत्र आलेल्या महिला पुरुषांमध्ये संबंध निर्माण होतात. काही काळ हे संबंध टिकतात, पण दोघांचा एकमेकामध्ये असलेला इन्ट्रेस संपला कि त्यांच्यात भांडणे सुरु होतात. असाच प्रकार भिवंडीतील अंजूर फाटा येथे घडला. प्रेमसंबंधास नकार दिल्याने २५ वर्षीय विवाहितेला रॉकेल अंगावर ओतून जिवंत जाळण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या महिलेचा उपचारादरम्यान मृत्यु झाला आहे. याप्रकरणी नारपोली पोलिसांनी सुनिजर वर्मा आणि त्यांचा मित्र रमेश वर्मा या दोघांविरोधात गुन्हा दाखल करून त्यांना अटक केली आहे.

भिवंडी येथील अंजुरफाटा भागात पिडीत २५ वर्षीय महिला राहत होती. ती विवाहित होती. तरीही तिचे सुनिजर याच्यासोबत प्रेमसंबंध होते. काही दिवसांपूर्वी तिचा त्याच्यासोबत वाद झाला. यातून तिने प्रेमसंबंध ठेवण्यास नकार दिला. त्यानंतरही सुनिजर तिला त्रास देत होता. १९ ऑक्टोबरला ती घरामध्ये एकटी होती. त्यावेळी सुनिजर आणि त्याचा मित्र रमेश हे दोघे घरात शिरले आणि त्यांनी तिच्या अंगावर रॉकेल ओतून तिला जाळले. पेटलेल्या अवस्थेत ती बाहेर आली. नागरिकांनी आग विजवून तिला रुग्णालयात दाखल केले. याबाबत माहिती मिळाल्यानंतर नारपोली पोलिसांनी रुग्णालयात तिचा जबाब नोंदवून घेतला होता. त्याआधारे पोलिसांनी सुनिजर आणि रमेश या दोघांविरोधात हत्येचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला होता. पोलिसांनी सुनिजर आणि रमेश यांना अटकही केली. दरम्यान, उपचारादम्यान मंगळवारी या महिलेचा मृत्यु झाला. यानंतर पोलिसांनी दोघांवर हत्येचा गुन्हा दाखल केला आहे.

## जेवण दिले नाही म्हणून त्याचे पित्त...

दरम्यान, ही दुर्दैवी घटना कळताच आजूबाजूच्या नागरिकांनी चांगुणा खोत यांना अलिबाग उपजिल्हा रुग्णालयात उपचाराकरता दाखल केले, मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. अघोरी व निर्दयी खून करणाऱ्या जयेश नामदेव खोत (वय २५) असे या संशयित तरुण आरोपीचे नाव आहे. हे कृत्य केल्यानंतर जयेश जंगलात पळून गेला होता. रायगड जिल्हा पोलिसांनी तात्काळ शोध मोहीम सुरू केली. मात्र, काळोख पडल्याने शोध मोहीम राबवणे कठीण जात होते. पण तरीही रायगड जिल्हा पोलिसांनी स्थानिकांच्या मदतीने त्याचा जंगलात झाडे–झुडुप नदी–नाल्यांमधून शोध घेण्यास सुरुवात केली. यावेळी तो एका झुडपात लपलेला दिसला. पोलिसांनी त्याला पकडण्याचा प्रयत्न करताना त्याने पोलिसांनाही कोयत्याचा धाक दाखवला.

अखेर दोन ते तीन तासांच्या पोलीस व ग्रामस्थांनी केलेल्या प्रयत्नांच्या शर्थीनंतर पहाटे दोन ते तीनच्या दरम्यान आरोपी मुलाला अटक करण्यात यश आले. जन्मदात्या आईलाच अत्यंत क्रूरपणे मृत्यूच्या खाईत लोटणाऱ्या मुलाचा अत्यंत संतापजनक प्रकारचा निषेध करण्यात येत आहे. या आरोपीला कठोर शिक्षा करावी अशी मागणी नागरिकांकडून करत संतप्त प्रतिक्रिया व्यक्त करण्यात येत आहेत. गुन्ह्याचा पुढील तपास मा. पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, उपविभागीय पोलीस अधिकारी अलिबाग अरूण भोर यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि राहुल अतिग्रे प्रभारी अधिकारी रेवदंडा हे करीत आहेत.सदर आरोपी विरूध्द रेवदंडा पोलीस ठाणे येथे कॉ.गु. रजि. नं. १९२/२०२३, भा.द.वि ३०२, ३०७, ३२३, ३२४,५०६ प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला आहे. आरोपीस अलिबाग यांच्या मा. न्यायालयासमोर हजर करून त्यास आरोपीस एक दिवसाची पोलीस कस्टडी मंजुर करण्यात आली आहे.

## ओळखीच्याकडे चहासाठी जाऊन...

पोउनि अमोल जगदाळे व पथक तसेच शिवडी पोलीस ठाणेचे पोलीस निरीक्षक, सचिन माने, स.पो.नि. स्नेहलसिंह खुळे व पथक, स.पो.नि. काळेकर व पथक, येलोगेट पो. ठाणेचे स.पो.नि. शेळके व पथक यांच्या १२ टीम तयार करण्यात आली. गुन्हयातील मृतदेहाची ओळख पटविण्याकरीता वडाळा पोलीस ठाणे हद्दीतील चिंधी गल्ली, नित्यानंदनगर, शहीद भगतसिंग नगर, संगमनगर तसेच मांडगा, ॲन्टॉपहिल, वडाळा टी.टी., आर.ए.के. मार्ग पोलीस ठाणे हद्दीत रवाना करून कोणी महिला बेपत्ता आहे काय? याबाबत चौकशी करण्याकरीता टीम रवाना केल्या. तसेच मृतदेहाचे फोटो व मतृदेहावरील दागिने यांचे फोटो काढून वडाळा व आजुबाजुच्या परिसरात प्रसिध्दी पत्रक वाटप केले तसेच व्हॉट्सॲपद्वारे देखील प्रसिध्दी दिली. नमुद टीम यांना तपासादरम्यान शहीद भगतसिंग रोड, चिंधी गल्ली येथील इटर्नल दोस्ती, को, ऑ.हौ.सो.सो. बिल्डींगमध्ये राहणारी महिला श्रीमती आरिफा जहीरूद्दीन काझी यांचेकडे चौकशी केली असता ३ ते ४ दिवसापासुन त्यांच्याकडे काम करणारी महिला सुग्राबी हुसेन मुल्ला (वय ७०) ही कामावर येत नसल्याचे समजले, त्यानंतर त्याच्या नातेवाईकांचा शोध घेण्यासाठी वडाळा पोलीस ठाणे हद्दीतील चिधी गल्ली, नित्यानंदनगर, शहीद भगतसिंग नगर, संगमनगर तसेच माटुंगा , ॲन्टॉपहिल, वडाळा टी.टी., आर.ए.के. मार्ग पोलीस ठाणे हददीत रवाना करण्यात आले.

पोलिसांचा शोध सुरू असताना,तपासा दरम्यान मृतक महिलेचा त्यांचा एक मुलगा संगमनगर व दुसरा मुलगा उलवे, नवी मुंबई येथे राहत असल्याची माहिती मिळाली.पोलिसांनी दोन्ही मुलांना गाठून व त्यांना विश्वासात घेवुन त्यांचेकडून मतृदेहावरील प्राप्त दागिने व शरीरावरून ओळख पटविली. गुन्हयाच्या अनुषंगाने श्वान पथक, फिंगरप्रिन्ट, न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा, कालिना, सांताक्रुझ, मुंबई यांचे मदतीने घटनास्थळावरून भौतिक पुरावे मिळविण्याकरीता मदत घेण्यात आली आहे. दरम्यान पोलिसांनी विविध पथक तयार करून या मृत महिलेचा शोध लावला. त्यानंतर काही तांत्रिक माहितीच्या आधारे पोलिसांनी आरोपीचा माग काढला. चौकशीनंतर संशयित आरोपी मोहमद फैज रफीक सय्यद उर्फ बाबा (२७) याला ताब्यात घेतले. त्याच्या कडे पोलिसांनी आरोपीची कसून चौकशी केली असता, धक्कादायक माहिती पुढे आली ती अशी. आरोपी मोहमद फैज रफीक सय्यद उर्फ बाबा हा वडाळा पूर्व येथील शहीद भगतसिंह नगर येथील रहिवासी आहे. तो मृतक महिला सुग्राबी हुसेन मुल्ला यांच्या परिचयाचा होता. सुग्राबी मुल्ला यांच्या अंगावरील दागिने पाहून मोहम्मद याला मोह झाला. त्यानंतर मुल्ला यांना चहा पिण्याच्या बहाण्याने घरी बोलाविले व तिच्या अंगावरील सोन्याचे दागिने पाहून त्याने महिलेची हत्या करण्याची योजना आखली. त्यानंतर त्याने तिच्या डोक्यावर लोखंडी सळी मारली. त्यात महिलेचा जमिनीवर पडून मृत्यू झाला. मृतदेहाची विल्हेवाट लावण्यासाठी त्याने तिला गोणीत भरले आणि त्याच्या राहत्या घराच्या पहिल्या माळयावरील खिडकीमधून तिला बाहेर टाकले. कोणीही व्यक्ती नसल्याचे खात्री करून तिची ओळख मिटविण्याकरीता ज्वलनशिल पदार्थ टाकून जाळून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केला.अशा प्रकारची कबुली दिली आहे. ही कामगिरी पोलीस सह आयुक्त (का व सु,) सत्यनारायण चौधरी, अपर पोलीस आयुक्त, द.प्रा.वि. डॉ. श्री. अभिनव देशमुख, पोलीस उप आयुक्त, बंदर परिमंडळ संजय लाटकर, सपोआ विजय भिसे यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक मिलींद जाधव यांचे नेतृत्वाखाली पोलीस निरीक्षक (गुन्हे) विकास म्हामुणकर, पोलीस निरीक्षक सचिन माने (शिवडी), स.पो.नि. प्रसाद शेकदार, पोउनि अमोल जगदाळे, पोउनि प्रशांत रणवरे, पोउनि शरद खाटमोडे, पोउनि अमृता गारूळे, तसेच शिवडी पोलीस ठाणेचे स.पो.नि. स्नेहलसिंह खुळे व पथक, स.पो.नि. काळेकर व पथक, येलोगेट पो. ठाणेचे स.पो.नि. शेळके व पथक, स.पो.नि. विशाल गायकवाड, पो.ह.संतोष पवार,भोसले, घाडगे पो.शि. भोरे, देविदास पालवे, प्रकाश कोळी, मखरे, साळवे, बाबर, काटे, वलेकर, शिवडी पो. ठाणेचे पो.ह.मुजावर, पो.शि. आठरे, जाधव, माळोदे, अमोल बच्छाव या पथकांनी यशस्वी कारवाई केली आहे.

## नोकरीवरून काढल्याने ड्रायव्हर भयंकर...

होत्या. पती अशोक हे घरची शेती आणि ऊस तोडीचा व्यवसाय बघत होते. हल्ली साखर कारखाना सुरू होण्याआधीच दोन तीन महिने ऊस तोड मजुरांना त्याचे अंगावर लाखो रूपये दयावे लागते तरच ते ऊस तोडीसाठी येत असतात.त्यामुळे अशोक सनदे हे काही मजुरांना हाताशी धरून कसे तरी करीत आपली टोळी चालवित होते. त्यातच ट्रॅक्टरवर काम करणारा सुनील जाधव हा अलिकडे मनमानी पध्दतीने काम करीत होता. तो त्याच्या शेतातील घरातच राहत होता परंतु हल्ली त्याला दारू पिण्याचे व्यसन लागल्याने तो काम धंदा न करता दारू पिऊन राहत होता. त्यामुळे अशोक सनदे याचे नुकसान होत होते. तो वेळेत कामावर हजर राहत नसल्याने मजुराकरवी ऊस तोड करून ही सनदे यांना वेळेत कारखान्याला ऊस पुरवठा करता येत नव्हता. एका ठिकाणाचे ऊस तोड करून तो कारखान्याला न्यायला सुनिल जाधव हा दोन दोन तीन तीन दिवस लावत होता. त्यामुळे गत ऊस हंगामात सनदे याचे खुप मोठे नुकसान झाले होते. एक एक गोष्टी सांभाळे पर्यत सनदे यांच्या नाकी नऊ येत होते. सनदे याची स्वत:ची ऊस तोड टोळी आणि स्वत:चा टॅक्टर असल्याने आजुबाजुच्या गावातील लोक सनदे यानांच ऊस तोडी करून तो कारखान्या पर्यत नेण्यास सांगत होते. परंतु अलिकडे सुनिल जाधव यांच्यामुळे त्याची गोची होत होती.त याला त्यांनी बऱ्याच वेळेला समजावून सांगितले तरी तो वेळेत कुठेलच काम करीत नव्हता.त्याला कामावरून काढून टाकावे तर त्याचे अंगावर मोठी रक्कम ही होती. ती रक्कम ही तो अशोक सनदे यांना परत करीत नव्हता आणि काम ही सोडत नव्हता. कसे तर करून गत हंगामा पर्यत अशोक सनदे यांनी त्याचेकडून काम करून घेऊन त्याचे पैसे फेडून घेतले. एकदा पैसे फेडून घेतल्यावर सुनिल जाधव हा त्याचेकडे परत आपल्या अंगावर पैसे मागू लागला होता. परंतु त्याचे काम समाधानकारक नसल्याने अशोक सनदे यांनी त्याला पैसे न देता आपल्या कामावरून काढून टाकले त्याचे जागी दुसऱ्या ड्रायव्हरला ठेवले. त्यामुळे सुनिल जाधव याची आर्थिक अडचण निर्माण झाली. त्याला दुसरीकडे ही कुठे काम मिळत नव्हते. तो विश्वासाने काम करत नसल्याचे अनेकांना माहित होते. त्यामुळे सुनिल याला आपल्या गावाकडे परत जाण्याशिवाय पर्याय नव्हता म्हणून तो मे जून च्या दरम्यान आपल्या गावी परत गेला ही, परंतु तेथे ही त्याचे मन रमेना म्हणून तो परत मुळ मालक अशोक सनदे याचेकडे काम मागण्यासाठी आला. अशोक सनदे यांनी त्याला काम न देता त्याचा अपमान करून त्याला परत पाठवून दिले. तो घुणकी परिसरातच कामाच्या शोधात राहत होता. त्याला काम मिळत नसल्याने तो अशोक सनदे याचेवर चिडून होता. अशोक सनदे हे काम देत नसल्याने सुनिल जाधव याने मध्यंतरी अशोक सनदे याच्या पत्नी सुषमा याच्या मार्फत कामासाठी प्रयत्न केले. त्यावेळी त्यांनी माझ्याकडे काही नाही, मालकाकडे सगळे आहे. त्यात तु काम धड करीत नाहीस त्यामुळे तुला कसे कामावर ठेवून घ्यायचे असे त्या त्याला म्हणाल्या. त्यांनी ही बाहेरचा रस्ता दाखविल्यावर तो सनदे पती पत्नीवर चिडला होता. सनदे यांनी कामावरून काढून टाकल्याचा राग त्याच्या मनाला लागला होता. सुनिल जाधव हा तसा गुन्हेगारी प्रवृतीचा होता. त्याच्यावर पुणे, नाशिक, दौंड रेल्वे पोलीस ठाण्यात या आधीच गुन्हे दाखल होते. त्याने आपली ही ओळख सनदे कुटुंबापासून लपवून ठेवली होती. हल्ली तो घुणकी परिसरात राहत मिळेल ते काम करून खात होता. त्याला फिक्स असे काम मिळत नव्हते.त्याला कुणी अंगावर ही पैसे देत नव्हते. त्यामुळे मिळेल त्या पैशातून दारू पिऊन इकडे तिकडे राहू लागला. कधी वाटेत अशोक सनदे हे भेटले की तो त्याचेकडे रागाने पाहत होता. त्याला कोणाचा राग कोणावर काढायची सवय होती. त्यामुळे त्याने आता अशोक सनदे याचा राग त्याची पत्नी सुषमा याचेवर काढायचे ठरविले. त्यांनी ही त्याला कामावर ठेवून घ्यायला विरोध केला होता. हे त्याला चांगले माहित होते. त्याचेमुळेच आपल्याला अशोक सनदे हे कामावर ठेवून घेतले नाही अशी त्याची समजुत झाली. त्यामुळे तो सुषमा सनदे याच्या मागावर राहत होता. त्याला सुषमा या आपली जनावरे घेऊन रोज दुपारी रानाकडे जात असतात हे माहित होते. सनदे याचे रान वारणा नदी काठी मडाग भागात असल्याचे त्याला माहित होते. रोज दुपारी घुणकी गावातून हायवे लगतच्या सर्व्हिस रस्त्यावरून सुषमा या आपल्या म्हैशी रानात चारायला नेत होत्या.

गुरूवार दि.२६ ऑक्टोंबर रोजी ही त्या नेहमी प्रमाणे दुपारी १२ ते १ च्या दरम्यान रानात म्हैशीना चारविण्यसाठी गेल्या. नदीकाठी रान असल्याने त्या आपल्या म्हैशीना चारवायला सोडून एका झाडाखाली निवांत बसल्या.बाजुलाच ऊसाचे रान असल्याने पाणी चालू करण्यासाठी म्हणून त्या पाचच्या सुमारास ऊसाच्या सरीतून जात असताना मध्येच सुनिल जाधव हा त्याच्या पुढयात आला. त्यावेळी तो दारू जास्त पिला होता. तो सुषमा यांना वाटेत अडवून त्याच्याशी वाद घालत होता.त्यावेळी सुषमा यांनी त्याला खडसावून बाजुला हो नाही तर आरडा ओरडा करून लोकांना जमा करेन अशी धमकी दिली. त्याला आधीच सुषमा याचा राग आला असल्याने त्याने त्याच्या धमकीकडे न घाबरता त्याच्याशी झटापट करीत त्यांना खाली पाडले. त्याच्या अंगावर बसून त्याने त्याचा गळा आपल्या दोन्ही हातानी गच्च आवळून धरला. त्यांना त्याने ओरडण्याची ही संधी दिली नाही. काही वेळातच त्याची हालचाल मंदावली. त्याचा जागीच मृत्यू झाला. त्याचा आपल्या हातून खून झाल्याचे लक्षात येताच सुनिल जाधव हा तेथून पळून गेला. इकडे सुषमा सनदे याची जनावरे मोकाटपणे दुसऱ्याच्या शेतात जावून चरू लागल्याने एकाच्या ही गोष्ट लक्षात आली. त्यांनी सुषमा यांना आवाज दिला. परंतु त्याच्याकडून काहीच प्रतिसाद न आल्याने त्याने या गोष्टीची माहिती सुषमा याच्या घरी त्याचे पती आणि दोन मुलांना दिली. अशोक सनदे यांनी आपल्या दोन्ही मुलांना बरोबर घेऊन सुषमा यांचा शोध घ्यायला सुरवात केली. परंतु बऱ्याचवेळेला त्याचा शोध घेऊन ही त्याचा शोध लागला नसल्याने अशोक सनदे यांनी आपली जनावरे दोन्ही मुलाच्याकडे सोपवून त्यांना घरी पाठवले. त्याचबरोबर रात्री उशिरा पर्यत त्यांनी सुषमा यांचा शोध घेतला. त्यानंतर ते घराकडे परत आले. सुषमा या बेपत्ता झाल्याची चर्चा गावात रात्री उशिरा पर्यत होत होती. त्यातच गावात एकाकडून त्यांना समजले की, त्याचेकडे ड्रायव्हर म्हणून काम करणाऱ्या सुनिल जाधव याने सुषमा याना कुठल्या तरी ऊसाच्या शेतात मारून टाकले आहे. त्याला ही घटना दारूच्या नशेत असणाऱ्या सुनिल जाधव याने संध्याकाळी सांगितली आणि तेथून तो नाशिक येथील आपल्या मुळ गावी गेला. ही माहिती मिळताच अशोक सनदे यांनी आपल्या नातेवाईकांना घेऊन परत शेताकडे गेले. तेथे त्यांनी रात्री उशिरापर्यंत बॅटरीच्या प्रकाशात सुषमा याचा शोध घेतला परंतु त्याचा शोध काही लागला नाही. दुसऱ्या दिवशी शुक्रवारी सकाळी मुडाग येथील ऊसाच्या सरीत सुषमा सनदे याचा मृतदेह पडला असल्याचे दिसून आले.त्याने या घटनेची माहिती गावचे पाटील संदीप तेली यांना दिली. त्यांनी घटनास्थळी जावून पाहिले. त्यांनतर या घटनेची माहिती गावातील लोकांना आणि सनदे याच्या कुटूंबाना मिळाल्यावर त्यांनी ही घटनास्थळी धाव घेतली. पोलीस पाटील तेली यांनी या घटनेची माहिती पेठवडगाव पोलीसांना दिल्यावर पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले. घटनास्थळी त्यांनी श्वान पथकाला ही पाचारण केले. परंतु श्वान हे घटनास्थळापासून थोडे पुढे जावून तेथेच घुटमळे. घटनास्थळी पोलीस उप विभागीय अधिकारी डॉ.रोहिणी सोंळुखे यांनी भेट देवून या घटनेची माहिती घेतली. पेठवडगाव पोलीसांनी घटनेचा आणि घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह पारगाव येथील ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदनसाठी पाठवून दिला. पोलीसांनी या घटनेची माहिती मयत सुषमा याचे पती अशोक सनदे याच्याकडून घेतली. त्यांनी ही संशयीत आरोपी सुनिल जाधव याचे नाव घेतल्याने त्याच्या शोधासाठी पोलीस पथके तयार करण्यात आली. अशोक सनदे याच्याकडून सुनिल जाधव याचा फोन नंबर घेऊन त्याच्या मागावर पोलीस गेले. सुनिल जाधव हा नाशिक परिसरात असल्याची माहिती त्याच्या मोबाईल लोकेशनवरून पोलीसांना समजली. पोलीसांचे एक पथक नाशिकडे रवाना होत असताना पुण्याच्या दिशेने तो परत येत असल्याचे त्याचे लोकेशन दाखवू लागले. यावरून पोलीसांनी पुणे ते नाशिक थाब्यावर त्याचा शोध घेऊ लागले. त्यातच पोलीसांच्या एका पथकाला शिवाजी नगर पुणे बस स्टॅन्डवर सुनिल जाधव हा नाशिकच्या एका बसमधून उतरताना दिसला. पोलीसांनी त्याला लगेच झडप टाकून ताब्यात घेतले. त्याला पेठवडगाव पोलीस स्टेशनला आणून त्याचेकडे सुषमा सनदे याच्या खूनाविषयी चौकशी केली. सुरूवातीला तो पोलीसांना उडवाउडवीचे उत्तरे देत होता. पोलीसांनी त्याला आपला पोलीसी खाक्या दाखविताच त्याने आपला गुन्हा कबुल करून तो का? आणि कशासाठी केला याची माहिती दिली. त्याने आपला गुन्हा कबुल केल्यावर मयत सुषमा सनदे याचे पती अशोक सनदे याच्याकडून या घटनेची फिर्याद पोलीसांनी घेतली. त्यानी दिलेल्या फिर्यादीवरून पेठवडगाव पोलीसांनी सुषमा अशोक सनदे (वय ४५) याच्या खून प्रकरणी सुनिल गणपती जाधव (वय २८) याच्या विरोधात भा.दं.वी. कलम ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्याला पेठवडगाव येथील न्यायालयात उभे केले असता मा.न्यायालयाने त्याला पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली. या घटनेचा तपास पो.निरी भैरव तळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पो.उप निरीक्षक गिरीश शिंदे, मिलींद टेळी, प्रमोद चव्हाण, धोडीराम वडर यांनी केला. हल्ली कोण कोणावर कशाचा ही डुख धरून राहत असल्याने रागाच्या भरात तो काय करेल हे सांगता येत नाही. तशीच गत सुनिल जाधव याची झाली. त्याला कामावरून काढून टाकल्याचा राग होता. पण तो राग त्याने मालका ऐवजी मालकाच्या बायकोवर काढला हेच या घटनेवरून दिसून येते.

## कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ...

तर घरीच बसून राहत होता. या कारणातून त्याचे आई बरोबर सारखी भांडणे होत होती. ती बिचारी काम करून थकत होती. परंतु हाता तोंडाला आलेला मुलगा ही कोणताही कामधंदा करीत नसल्याने त्याचे लग्न तरी कसे करायचे या विचारात ती असायची. तो कामधंदा करीत नसल्याने आणि दारूच्या व्यसनाच्या आहरी गेल्याने मुली ही त्याला कुणी दाखवायला तयार नव्हते. वयाची ३० शी ओलांडली तरी तो बिनकामाचा फिरत होता. संगत गुण ते सोबत गुण या प्रमाणे त्याचे मित्र ही त्याला दारू पाजत होते. वाईट मित्राच्या संगतीला लागून निलेश हा जास्तच दारू पित होता. त्याला घरची कोणतीही जबाबदारी नको होती. आई सुनिता याचे वय होत आले तरी ती बिचारी काम करून त्याच्याच पोटाला घालत होती. निलेशचा ही मागे काही वर्षापूर्वी मोठा अपघात झाला होता. त्यावेळी त्याच्या डोक्याला मोठा मार लागला होता. त्यात त्याचे डोक्याचे ऑपरेशन ही झाले होते. त्यामुळे कधी कधी त्याचे डोके भ्रमिष्ट होत होते. तो कसा तरी वागत होता. काही तरी बडबडत असायचा म्हणून त्याची आई त्याला जपत होती याचा त्याने वेगळाच अर्थ काढला होता. त्याचे दारू पिण्याचे प्रमाण इतके वाढले होते की त्याच्या आईने त्याचे दारू पिण्याचे व्यसन सोडविण्यासाठी बरेच प्रयत्न ही केले. परंतु त्यात तिला काही यश आले नाही. हल्ली तर तो जास्तच दारू पित होता. त्याला दारू मिळाली नाही तर तो सगळे घर डोक्यावर घेत होता. त्याची दारूची नशा दोन दोन दिवस उतरत नव्हती. आईच्या कामाच्या मजुरीचे पैसे तो चोरून दारूत उडवित होता. त्यामुळे त्याची आई ही त्याचेवर चिडत होती रागावत होती. एक तर घरप्रंपंच चालवायचा कसे हा तिच्यासमोर प्रश्न होता. नवऱ्याचे रहाते घर एवढीच काय त्याची प्रॉप्रटी होती. हल्ली निलेश हा घर राहते घर ही आपल्या नावावर कर म्हणून आईच्या मागे लागला होता. पुढे मागे वारस तोच होता. पण दारूच्या व्यसनापायी राहते घर ही तो विकायला किंवा त्याचेवर पैसे काढायला तो मागे पुढे बघणार नाही हे सुनिता यांना चांगले माहित होते म्हणून त्या त्याला घर नावावर करून दयायला तयार नव्हत्या. दारू प्यायला पैसे पाहिजे असले की तो आईकडे सारखा पैशाचा तगादा लावायचा तिने पैसे दिले नाही तर तो जबरदस्तीने तिच्याकडून पैसे काढून घ्यायचा. कधी कधी तर तो त्यासाठी आईला मारहाण ही करायचा.त्यामुळे त्याला कोणतीही गोष्ट सांगून उपयोग ही नव्हती. शेजाऱ्यांनी आणि नातलगांनी ही त्याला बऱ्याचवेळेला समजावून सांगून आईला त्रास देवू नकोस असे सांगितले होते. तरी देखील तो दारू साठी पैसे पाहिजेत म्हणून आईला मारहाण करीत होता. त्याच्या त्रासाला वैतागून सुनिता या पै पाहुण्याच्याकडे जावून राहत होत्या. तेथे तर त्या किती दिवस राहणार दोन चार दिवस गेले की त्या परत वंदुरला आपल्या घरी येत होत्या. परत त्या माय लेकांचे मागचे तसे पुढे चालू असायचे. संपुर्ण महाराष्ट्रात मराठा आरक्षणाचा वणवा पेटला असल्याने या आरक्षणाच्या आंदोलनाच्या माध्यामातून तरूण मुलांची माथी भडकविण्याचे काम काही लोक करीत आहेत. रिकाम टेकडया तरूणांना हाताशी धरून या आंदोलनाची धग वाढवली जात आहे. या आंदोलनाचा वणवा सगळीकडे पसरला असल्याने या आंदोलनात निलेश सारखे काही रिकामटेकडे तरूण ही सामील झाले आहेत. बुधवार दि.१ नोव्हेंबर रोजी निलेशने आपल्या वंदुर गावी आपल्या राहत्या घरासमोरील रस्ता दगड टाकून आडवून धरला होता. त्या रस्त्यावर त्याने कचरा टाकून तो पेटवून दिला आणि त्याचे व्हिडीओ तयार करून व्हायरल केले. दारूच्या नशेत त्याने हे सगळे केले होते. त्याच्यासोबत त्याचे दोन तीन मित्र ही त्यावेळी होते. ते ही दारू पिऊन मराठा आंदोलनात सामील होऊन गावात फिरत होते. सकाळ पासून निलेश आणि त्याचे मित्र दारू फुल्ल प्यायलेले असल्याने त्यांना कशाची शुध्द नव्हती. मराठा आरक्षणाच्या घोषणा देवून त्याचा घसा कोरडा पडला होता. संध्याकाळी निलेशला परत दारू पिण्याची तल्लफ झाली. पण त्याच्या खिशात एक दमडी देखील नव्हती. त्याला दारू तर प्यायची होती त्यासाठी त्याला गावात कुणी पैसे ही दिले नव्हते. म्हणून तो रात्री उशिरा घराकडे आला. त्याची आई जेवण तयार करीत असताना ती त्याला दोन घास खावून घे असे म्हणाली, तु दारू प्यायला आहेस उपाशी पोटी झोपू नकोस असे तिने बजावले. ती त्याला जेवणासाठी जबदस्ती करीत होती पण त्याला अजून दारू प्यायची असल्याने तो तिच्याकडे दारूसाठी पैसे मागत होता. तिने त्याला आपल्याजवळ पैसे नाहीत असे स्पष्ट सांगितले त्यावर त्या दोघात भांडण सुरू झाले. अगोदरच निलेशने फुल्ल दारू प्यायली असल्याने त्याला नशा तशी होतीच. तो त्या नशेत आईला शिवीगाळ करू लागला. त्यावर ती ही त्याला रागात म्हणाली कुत्र्या एवढा मोठा रेडा झालास दोन पैसे मिळवायची अक्कल नाही,उलट दारूसाठी माझ्याकडे कशाला पैसे मागतोस. काही तरी कामधंदा कर.नीट वाग असे म्हणाली. याचा राग त्याला आला.त्याच्या घरात नेहमीच आई आणि मुलांचे भांडण होत असते हे शेजाऱ्यांना माहित असल्याने त्यांनी ही त्यावेळी त्यांच्या भांडणाकडे लक्ष दिले नाही. रागाच्या भरात असणाऱ्या निलेशने आईला बाहेरील खोलीत ओढत आणून लाथा बुक्यांनी मारहाण करायला सुरूवात केली. त्याची आई ओरडत होती तरी तो तिला मारहाण करीत होता. मला पैसे देणार नाहीस घर ही नावावर करणार नाहीस तर कोणाला तु देणार म्हणून त्याने तिचे डोके भिंतीला आपटले. तिच्या डोक्याला लागल्याने ती तडफडत होती. त्यातच त्याने तिचा गळा जोरात आवळून धरला. ती त्याच्या तावडीतून सुटण्याचा प्रयत्न करीत असताना निलेशने आपल्याकडील चाकू काढला आणि तिच्या गळ्यावर पोटावर चालविला. त्याने चाकूने वार केल्याने ती रक्ताच्या थारोळ्यात निपचिप पडली. त्याला कशाचीच शुध्द नव्हती. आई रक्ताच्या थारोळ्यात बेशुध्द पडली असेल असे त्याला वाटले. त्याने रक्ताचे डाग एका कपडयाने पुसले आणि तो तसाच घराबाहेर येऊन झोपला. गुरूवारी सकाळी तो उठला, त्याचे डोके भिणभिणत होते रात्री आपल्या हातून काय घडले आहे याची त्याला जाणीव नव्हती. तो तसाच उठला आणि सकाळ सकाळीच दारू अड्डयावर जावून परत उधारीवर दारू प्यायला. दारू पिऊन झिंगतच तो घराकडे आला.दारूच्या नशेत तो घरात आला आतील खोलीत गेला त्याने जमीनीवर पडलेल्या आपल्या आईला उठविण्याचा प्रयत्न केला.आई उठत नसल्याचे बघून त्याने शेजारीच राहत असलेल्या आपल्या चुलत भावाला बोलावून घरी आणले. त्याला आई उठत नसल्याचे सांगितले. चुलत भावाने त्याच्या घरी येऊन पाहिले तर निलेशची आई रक्ताच्या थारोळ्यात पडलेली होती. तिच्या गळ्यावर आणि पोटावर चाकूने वार केल्याचे दिसत होते. त्याने याबाबत निलेशला विचारले तर तो ही दारूच्या नशेत असल्याने त्याला काही सांगता येईना. त्याने काय ओळखायचे ते ओळखून आजुबाजूला राहणाऱ्या आपल्या भाऊबंदाना बोलावून घेऊन या घटनेची माहिती दिली. निलेश हा दारूच्या नशेत घराबाहेर आपल्या डोक्याला हात लावून बसला. या घटनेची माहिती मिळताच वंदुर गावातील लोकांनी ही वाईंगडे याच्या घरासमोर गर्दी केली. शेवटचा उपाय म्हणून निलेशच्या चुलत भावाने आणि इतर दोघा तिघांनी सुनिता यांना गावातील प्रथम उपचार केंद्रात नेले. तेथील डॉक्टरांनी त्यांना तपासून त्याचा मृत्यू रात्रीच झाल्याचे त्यांना सांगितले. त्यानंतर कुणी तरी या घटनेची माहिती कागल पोलीसांना दिल्यावर पोलीस ही तातडीने घटनास्थळी आले. घटनास्थळी विभागीय पोलीस अधिकारी संकेत गोसावी, पो.निरी.गजेंद्र लोहार यांनी भेट देवून या घटनेची माहिती घेतली. कागल पोलीसांनी घटनेचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनसाठी कागल येथील सरकारी रुग्णालयात पाठवला. ही घटना कोणत्या कारणातून घडली आहे आणि यातील संशयीत आरोपी कोण आहे याची माहिती मिळाल्याने पोलीसांनी तपसाला सुरूवात करून या घटनेतील संशयीत निलेश वाईंगडे याला ताब्यात घेतले.त्याला कागल पोलीस स्टेशनला आणून त्याच्याकडे या घटनेची चौकशी केली असता तो पोलीसांना काही सांगू शकत नव्हता. तो फक्त एवढेच म्हणत होता मी माझ्या आईला मारले हो, त्याची दारूची नशा उतरल्यावर पोलीसांनी त्याला बोलते केले असता त्याने आपला गुन्हा कबुल करून आपल्या आईचा खून केल्याचे कबुल केले. त्याने गुन्हा कबुल केल्यावर या घटनेची फिर्याद निलेश याच्या चुलत भावाकडून घेतली. त्याने दिलेल्या फिर्यादीनुसार श्रीमती सुनिता अशोक वाईंगडे (वय ५१) याच्या खून प्रकरणी निलेश अशोक वाईंगडे (वय ३०) याच्या विरोधात कागल पोलीस ठाण्यात भा.दं.वी. कलम ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्याला कागल येथील न्यायालयात उभे केले असता मा.न्यायालयाने त्याला चार दिवसाची पोलीस कोठडी सुनावली. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याचेकडून गुन्हयात वापरलेला चाकू जप्त केला. या घटनेचा पुढील तपास कागल पोलीस स्टेशनचे पो.निरी.गजेंद्र लोहार यांच्या मार्गदर्शनाखाली पो.उप. निरी. गच्चे हे करीत आहेत. कोणतेही व्यसन हे माणसाला बुडवत असते. त्यातच दारू सारखे व्यसन असले की काही विचारण्याची सोय नसते. दारूडया माणसाला दारू प्यायला मिळाली नाही तर तो कोणत्या ही टोकला जातो हेच या घटनेवरून दिसून येते.

# जादूटोणा प्रतिबंध व निर्मूलन कायदा जनसंवाद – जनजागृती यात्राचे पालघर जिल्ह्यात पदार्पण!




**पालघर/एच. लोखंडे**

महाराष्ट्र राज्य मानवी बळी प्रतिबंध व निर्मूलन आणि इतर अमानवी कृत्य आणि घृणास्पद प्रथा आणि जादूटोणा कायदा - २०१३च्या अनुशंगाने, जादूटोणा विरोधी कायदा म्हणून प्रसिद्ध आहे. या कायद्याच्या १० व्या वर्धापन दिनानिमित्त, महाराष्ट्र राज्यव्यापी जादूटोणा विरोधी- चेटूक विरोधी कायदा जनसंवाद, जनसंपर्क, जनजागृती, यासाठी जनप्रबोधन यात्रा २० ऑगस्ट २०२३ रोजी पुणे येथून सुरू झाली आहे. यानिमित्तानाने सजवलेली गाडी सह, पालघर जिल्ह्यातील गावागावात जनसंवाद, जनजागृती करण्यासाठी, दिनांक ६ नोव्हेंबर २०२३ रोजी सकाळी ९- ३० वाजता, सर्वप्रथम पालघर जिल्ह्यातील जव्हार तालुक्यात आगमन होणार आहे. सदर जनसंवाद, जनजागृती, प्रबोधन यात्रा, महाराष्ट्र राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात गेल्यावर, त्या जिल्ह्यातील, पोलीस अधीक्षक, पोलीस अधिकारी - कर्मचारी, प्रत्येक पोलीस पाटील, ग्रामपंचायत पदाधिकारी, जि. परिषद - सदस्य, पंचायत समिती - सदस्य, अंगणवाडी सेविका, शिक्षिक कर्मचारी सहभागी होऊन, जादूटोणा प्रतिबंधक व निर्मूलन कायदा, प्रचारासाठी गावागावातील सार्वजनिक ठिकाणी एकत्रित येऊन कार्यक्रमाचे आयोजन करणारे आहेत. हि ९० दिवसीय महाराष्ट्र राज्यव्यापी जनसंवाद, जनजागृती यात्रा असून. प्रत्येक ठिकाणी, गावात मा. डॉ. नरेंद्र दाभोळकर यांची पुस्तके, चमत्कारिक साहित्य आदी विक्री साठी उपलब्ध असणार आहे. या जनसंवाद, जनजागृती कार्यक्रमात नंदिनी जाधव- पुणे, यांचे कायद्या विषय अमूल्य मार्गदर्शन लाभणार आहे. तर श्री. भगवान रणदिवे - सातारा, श्री. प्रशांत पोतदार - सातारा, जादूटोणा प्रतिबंधक व निर्मूलन समिती राज्य कार्यकारिणी समिती सदस्य उपस्थित राहून मार्गदर्शन करणे आहेत. जनजागृती - जनसंपर्क - जनसंवाद यात्रेचे दिनांक ६ नोव्हेंबर रोजी पालघर जिल्ह्यातील जव्हार तालुक्यात आगमना नंतर पूढे विक्रमगड, पालघर, वसई तालुका या प्रमाणे पुढे पुढे जात राहणार आहे. तरी जनजागृती, प्रबोधन, जनसंवाद यात्रेत सहभागी भागी होऊन, एक जुटीने मानवी बळी प्रतिबंध व निर्मूलन, अमानवी प्रथा, जादूटोणा, आदी प्रथा नष्ट करण्यासाठी आपला सहभाग अनिवार्य आहे. तरी या सामाजिक जनजागृती कार्यात सहभागी होणे ही काळाची गरज ओळखून सहभागी. व्हावे हिच डॉ. नरेंद्र दाभोळकर यांना मानवंदना. सदर माहिती श्री जतिन कदम सर सफाळे यांच्या कडून मिळत आहे.

# भिवंडीतील १४ ग्रामपंचायतींच्या निवडणुकीचा प्रचार थांबला




**भिवंडी/प्रतिनिधी**

रविवार ५ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या भिवंडी तालुक्यातील १४ ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकेच्या प्रचाराच्या तोफा शुक्रवारी सायंकाळी पाच वाजता थंडावल्या आहेत. जाहीर प्रचाराचा शुक्रवार हा शेवटचा दिवस असल्याने अनेकांनी प्रचार रॅली काढून मतदारांपर्यंत पोहचण्याचा प्रयत्न केला आहे. तालुक्यातील एकूण १६ ग्रामपंचायतीच्या निवडणुका जाहीर झाल्या होत्या. त्यापैकी महाळूंगे व मोरणी ग्रामपंचायतीच्या सरपंच व सदस्य बिनविरोध निवडले गेल्याने उर्वरित १४ ग्रामपंचायती मधील १३ थेट सरपंच व एकूण १५८ सदस्यांपैकी २५ सदस्य बिनविरोध निवडले गेल्याने उर्वरित १३३ सदस्य पदांसाठी मतदान होणार आहे. तर अर्जुनली ग्रामपंचायती च्या एका पोटनिवडणूकसाठी २५४९७ पुरुष १८२५१ स्त्री व १७ इतर असे एकूण ४३७६५ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. तर या निवडणुकी साठी एकूण ७३ मतदान केंद्रांवर अधिकारी कर्मचारी पोलिस बंदोबस्त नेमण्यात आला असल्याची माहिती तहसीलदार कार्यालयाने दिली आहे. ग्रामपंचायत निवडणुका राजकीय पक्षांच्या चीन्हांवर लढविल्या जात नसल्या तरी पक्ष पुरस्कृत उमेदवार या निवडणुकीत आपली प्रतिष्ठा पणाला लावून प्रचार करीत आहेत. त्यासाठी प्रत्येक ठिकाणी दररोज जेवणावळी च्या पंगती बसत असून येत्या दोन रात्री उमेदवार मतदारांच्या वयक्तिक गाठीभेटी घेऊन आपल्या शेवटच्या प्रचारावर जोर देणार आहेत.

# वाडा तालुक्यात वीज चोरा विरोधात धडक कारवाई, एक कोटींची वीजचोरी पकडली



**पालघर/प्रतिनिधी**

पालघर जिल्ह्यातील, वाडा तालुक्यात १कोटीं रूपयांची वीज चोऱ्या उघडकीस आली असून, दंडाची रक्कम व थकित बिले न भरल्यास १२९विजचोरावर गुन्हे दाखल होणार. या बद्दल महावितरण अधिकारी यांच्या कडून मिळत आहे. वाडा तालुक्यात अनेक गावात वीजचोरी केली जात असल्याची माहिती महावितरणला मिळाली होती. या माहितीच्या आधारे महावितरणचे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी वाडा तालुक्यातील, वाडा आगरआळी, कुडूस, डाकीवली, घोटावडे, शिरोळे, चाबळे, झिडके, चामबळे, शेडगाव, असनस, दिनकरपाडा, अम्बिस्ते, भावेघर, म्हसरोळी, शेडगाव, कंचाड, शिरसाड, म्हसरोली, वरले, सापरोंडे, निचोळे, बिलोशी, बोराडे, किनईपाडा, भसाळपाडा, शिरसाळ, खानिवली- शिरोळे, पालसई, खानिवली आदी वाडा तालुक्यातील, अनेक ठिकाणी महावितरण कडून करण्यात आलेल्या कारवाईत अंदाजे एकूण, १ कोटी १ लाख ५६ हजार १६० रुपयांची वीजचोरी उघडकीस आणली आहे. या धाडसत्राने वीजचोरांच्या मनात भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. या कारवाईत पकडण्यात आलेल्या विज ग्राहकांनी वीजचोरीची दंडात्मक कारवाई केलेली विजबिले अदा केली नाही,किंवा देण्यात आलेली वीज बिले भरली नाहीत, अशा ग्राहकांवर विद्युत कलम कायदा १३५, १३८ व १२६ नुसार पोलीस ठाणे जव्हार व भिवंडी येथे गुन्हा दाखल करण्यात येत असल्याची माहिती श्री. कटकवार सक्षम महावितरण अधिकारी यांनी दिली आहे. वाडा तालुक्यातील सर्व विद्युत ग्राहकांना महावितरणद्वारे सूचित करण्यात आले आहे, की महावितरण विद्युत ग्राहक यांनी लवकरात लवकर आपले थकीत वीजदेयक (लाईट बिल) भरून महावितरण कंपनीस सहकार्य करावे, महावितरण कर्मचारी यांनी, खंडित केलेला विद्युतपुरवठा स्वतः जोडून घेणाऱ्या ग्राहकांवर कलम १३८ नुसार फौजदारी गुन्हे नोंदवण्यात येतील, या बद्दल उपकार्यकारी अभियंत्याने सर्वाना सुचित केले आहे. घरात इनकमिंग वायरला जॉइंट असणे, मीटर बायपास, मीटरमध्ये छेडछाड करणे, मीटरचे एम. सील काढणे, हे वीजचोरीचे प्रकार आहेत. वीजचोरी करणाऱ्या व्यक्तीस वीज कायदा २००३ चे कलम १३५, १३८ व १२६ नुसार तीन वर्षापर्यंतचा कारावास किंवा दंडाची किंवा दोन्ही अशी शिक्षेची तरतूद आहे. तरी सर्व वीज ग्राहकांनी महावितरणकडून अधिकृत वीजजोडणी घेऊन विजेचा वापर करावा, असे श्री. अविनाश कटकवार- उपकार्यकारी अभियंता यांनी आवाहन केले आहे.

# कृषि महाविद्यालय लातूर येथे दक्षता जनजागृती सप्ताह संपन्न




**लातूर/प्रतिनिधी**

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी अंतर्गत कृषि महाविद्यालय लातूर येथे दक्षता जनजागृती सप्ताहाचे आयोजन विद्यार्थी समुपदेशन व रोजगार कक्षाच्या वतीने करण्यात आले होते. भारताचे भूतपूर्व गृहमंत्री लोहपुरूष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीचे औचित्य साधून लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या वतीने ३० ऑक्टोबर २०२३ ते ०५ नोव्हेंबर २०२३ या कालावधीत दक्षता जनजागृती सप्ताहाचे आयोजन करण्यात येते. भ्रष्टाचार ही समाज पोखरणारी कीड असून तिचे समूळ उच्चाटन हेच समृद्ध भारताचे गमक आहे. तरुणांनी भ्रष्टाचार मुक्त भारताचे आधार स्तंभ व्हावे असे आवाहन कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता तथा प्राचार्य डॉ बाबासाहेब ठोंबरे यांनी आपल्या अध्यक्षपर भाषणात बोलताना विद्यार्थ्यांना केले. कृषि महाविद्यालयात विद्यार्थ्यांना भ्रष्टाचाराचे तोटे व त्यावर प्रतिबंधात्मक उपाय याची माहिती देण्यात आली.

यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे उप अधीक्षक पंडित रेजितवाड, तर प्रमुख अतिथी म्हणून भास्कर पिल्ले, डॉ.विश्वनाथ कांबळे, डॉ.दिनेशसिंह चौहान यांची उपस्थिती होती. अध्यक्षीय समारोपात डॉ.ठोंबरे म्हणाले की, जागतिक पारदर्शकता सूचकांकात १८० देशांमध्ये पहिल्या काही नावांमध्ये डेन्मार्क, सिंगापूर यांचा समावेश असून भारताचा ८५वा क्रमांक आहे. तर सोमालिया हा सर्वात शेवटी आहे म्हणूनच तरुणांनी भ्रष्टाचार मुक्त भारताचे आधारस्तंभ व्हावे असे आवाहन विद्यार्थ्यांना केले. प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलताना रेजितवाड म्हणाले की, नागरीकांनी आज कोणालाही घाबरण्याचे कारण नाही. त्यांच्या पाठीशी पोलीस व न्यायपालिका सदैव असून त्यांनी अधिक सजग राहून भ्रष्टाचार विरोधी तक्रारी दाखल कराव्यात. यावेळी उपस्थितांना 'भ्रष्टाचाराला नाही म्हणा : राष्ट्रासाठी वचनबद्ध व्हा' या बोधवाक्यासह भ्रष्टाचार विरोधी वर्तणुकीची शपथ देण्यात आली. मेरी माटी मेरा देश अभियानांतर्गत आमच्या मनातील देशभक्तीची भावना समृद्ध होण्यासाठी ओंजळीत मृदेचे प्रकटीकरणही करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक डॉ. विजय भामरे यांनी तर आभार डॉ. दयानंद मोरे यांनी मानले. याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व शिक्षकवर्गीय अधिकारी, कर्मचारी तसेच विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**महाराष्ट्र शासन**

**सार्वजनिक बांधकाम विभाग, जव्हार, जि. पालघर ४०१ ६०३**

web. http://mahatenders.gov.in, email. jawhar.ee@mahapwd.com

**ई-निविदा सूचना क्रमांक ३२ सन २०२३-२४**

कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, जव्हार जिल्हा पालघर महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून निविदेमधील सर्व अटी शर्तींची पुर्तता करणाऱ्या योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत पालघर जिल्ह्यातील **नोंदणीकृत सुशिक्षित बेरोजगार अभियंतांकडून** खालील कामांकरीता 'बी-१' नमुन्यातील ई-निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या संकेत स्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता सा.बां. विभाग, जव्हार यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजीत रक्कम रुपये लाखात | नोंदणी वर्ग | ई-निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी | लेखाशीर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | जव्हार येथील कर्मचारी निवासस्थान वर्ग -४ येथील इमारतीच्या गच्चीवर पत्रा शेड करणे.ता.जव्हार, जि.पालघर | ११,९७,२३७.०० | वर्ग ५ अ व त्यावरील | ५००/- + १८% जीएसटी रु.९०/- एकूण - ५९०/- | १८० दिवस (पावसाळा धरून) | २२२५ अनुसूचित जाती /अनुसुचित जमाती २२२५E४०९ |
| २. | जव्हार येथील कर्मचारी निवासस्थान वर्ग-३ इमारतीच्या गच्चीवर पत्रा शेड करणे. ता. जव्हार, जि. पालघर | १३,४७,३३६.०० | वर्ग ५ अ व त्यावरील | ५००/- + १८% जीएसटी रु.९०/- एकूण - ५९०/- | १८० दिवस (पावसाळा धरून) | २२२५ अनुसूचित जाती /अनुसुचित जमाती २२२५E४०९-२७ |
| ३. | मौजे देहरे येथील शिवमंदिरालगत सभागृह हॉल बांधणे. ता. जव्हार, जि. पालघर | १६,४५,५३८.०० | वर्ग ५ अ व त्यावरील | ५००/- + १८% जीएसटी रु.९०/- एकूण - ५९०/- | १८० दिवस (पावसाळा धरून) | ८४४३ खासदार निधी ८४४३५१०९ ०३ |

**ई-निविदा उपलब्ध कालावधी - दिनांक : ०९/११/२०२३ ते दिनांक : १६/११/२०२३ पर्यंत**

**ई-निविदा उघडणे (शक्य झाल्या) - दिनांक : १७/११/२०२३ (११.०० वा. शक्य झाल्यास)**

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, जव्हार यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

टिप : -

१. सर्व पात्र/इच्छुक निविदाकारांनी निविदापत्रक डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी ई-निविदा प्रणालीच्या http://mahatenders.gov.in

२. निविदाकारांनी वर नमूद केलेल्या संकेतस्थळावर ऑनलाईन देकार भरणे संदर्भात व DSC डिजटल प्रमाणपत्र वितरीत व Portal वर Enrollment करण्यासंदर्भात काही शंका/ अडचणी असल्यास त्यांनी खालील दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.180030702232
E Mail : eproc.maharashtra@gmail.com, cppp-support@nic.in

३. निविदाकारांनी निविदा संदर्भात सर्व दस्तऐवज ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहील. तसेच इसारा/बयाणा रक्कम, ई-निविदा संचाची किंमत याबाबतचे दस्तऐवजाच्या मूळ प्रती स्वतःच्या नावाची गोपनीयता बाळगून ई-निविदा वेळपत्रकामध्ये नमूद केलेल्या दिनांक व वेळेपर्यंत सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा ई-निविदा प्रक्रियेत सहभागी होता येणार नाही.

४. सादर केलेल्या निविदा कागदपत्रांची प्रत स्वतंत्र पाकिटात दिनांक : ०१/११/२०२३ रोजी किंवा त्यापुर्वी कार्यालयीन वेळेत सादर करावी.

५. शासन निर्णयानुसार निम्नतम निविदाकाराचा (L-1) कमी दराबाबतचा (Performance Security)चा DD/FDR/BG लिफाफा क्र. २ (Financial Bid) उघडल्याच्या दिनांकापासून ८ (आठ) दिवसांच्या आत या कार्यालयास सादर करण्यात यावा. सादर न केल्यास निम्नतम निविदाकारांची (L-1) इसारा रक्कम (EMD) शासन जमा करण्यात येईल व द्वितीय निम्नतम निविदाकारास (L-2) काम देण्याची पुढील कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

६. इतर अटी व शर्ती ई-निविदेमध्ये पहावयास मिळतील. सदर कामांची ई-निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवलेले आहेत.

७. वरील कामांची ई-निविदा सूचना सार्वजनिक बांधकाम विभागाच्या www.mahapwd.com या इंटरनेटवरील वेबसाईटवर उपलब्ध आहे.

**जा.क्र./सा.बां./जव्हार/निविदा/६०९३/२०२३**
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
सार्वजनिक बांधकाम विभाग, जव्हार
जिल्हा पालघर पिनकोड ४०१ ६०३
फोन नं. ०२५२०-२२२२३६
दिनांक : २७/१०/२०२३

**सही/-**
**कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम, विभाग**
**जव्हार, जि. पालघर**

**जिमाका/पालघर/जाहि १२४/५१६/२०२३ दिनांक : ०३/११/२०२३**

# कास्ट्राईब कर्मचारी महासंघाच्या जिल्हा सरचिटणीपदी अशोक माळगे



**लातूर/प्रतिनिधी**

कास्ट्राईब कर्मचारी महासंघाच्या लातूर जिल्हा सरचिटणीसपदी अशोक माळगे यांची निवड महासंघाचे संस्थापक अध्यक्ष कृष्णा इंगळे यांनी केली. माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या लातूर विभागीय माहिती कार्यालयाचे सहायक अधीक्षक श्री. माळगे यांच्या या निवडीबद्दल नागपूर येथील अधिवेशनात श्री. इंगळे यांनी सत्कारही केला. कार्याध्यक्ष गणेश मडावी, वरिष्ठ राज्य उपाध्यक्ष सुमित भुईगळ यांच्या सूचनेनुसार श्री.माळगे यांची निवड झाली. यासंबंधीचे नियुक्तीपत्र लातूर जिल्हाध्यक्ष नितीन बनसोडे यांनी नुकतेच त्यांना दिले. संघटनेतील सक्रिय सहभागाची दखल घेऊन श्री. माळगे यांची निवड झाल्याचे बनसोडे म्हणाले.

या निवडीबद्दल माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील अधिकारी व कर्मचारी, कास्ट्राईब कर्मचारी महासंघ, लातूर उपाध्यक्ष गणेश राठोड, कोषाध्यक्ष प्रशांत म्हेत्रे, जिल्हा संघटक नागरत्न कांबळे, शिक्षक संघटनेचे अध्यक्ष सुभाष मस्के, जिल्हा परिषदेचे सुधीर बोकेफोडे, ओमकार वंजारे, पाटबंधारे विभागाचे निलराज बनसोडे, आरोग्य विभागाचे रवी उदगीरकर, प्रसिद्धी प्रमुख बालाजी केंद्रे, विविध संघटनांचे पदाधिकारी आदींनी श्री. माळगे यांच्या निवडीबद्दल आनंद व्यक्त करत त्यांचे अभिनंदन केले.

# समाजिक कार्यकर्त्या मंदा कांबळे यांचा शारदा विद्यालयात सत्कार



**वाडा/प्रतिनिधी**

आस्था समाजिक संस्थेच्या वतीने पी.जे. हायस्कुल येथे संपन्न झालेल्या कार्यक्रमात संस्थेच्या वतीने मंदा कांबळे यांचा उत्कृष्ट समाजिक कार्याबद्दक राज्यस्थरीय सिंधुताई सपकाळ पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. त्या अनुषंगाने वाडा तालुक्यातील नेहरोली येथील शारदा विद्यालयातील स्कूल कमिटीच्या वतीने त्यांचा शाल, श्रीफळ व पूष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले. याप्रसंगी मुख्याध्यापक नरेंद्र मोरे, आर. वाय. पवार, ललित पाटील, उत्तम जाधव, हेमंत वाघ, बाबाजी चोरमुळे, मेघा पारधी, संगीता वाळिंबे व इतर शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

## नावात बदल

मी अजीत पाल रा. १८९१, इंडस्ट्रीयल इस्टेट गौरीपाडा, माकल पाडा, वसई (पु), ता. वसई, जि. पालघर ४०१२०८. माझे नाव अजीत दयाशंकर पाल व माझे नाव शैक्षणिक कागदपत्रांमध्ये पाल अजीतकुमार दयाशंकर असे आहे. माझे खरे आणि बरोबर नाव अजीत दयाशंकर पाल असे असून मी हेच नाव सगळीकडे वापरतो. यापुढे अजीत दयाशंकर पाल या नवीन नावाने संबोधले जावे.

**सही/-**
**अजीत दयाशंकर पाल**

06 TO 12 NOVEMBER 2023 - Page 4 (CRIME SANDHYA):Layout 1 11/4/2023 10:09 PM Page 1



# नो बॉलवर जरांगे पाटलांची विकेट!

सामान्य माणसाला कसे सहज बसवता येते हे मराठा आरक्षणाच्या आंदोलनाच्या मुद्यावरून लोकांनी पाहिले. संविधानातील तरतुदीनुसार मराठा समाज हा आर्थिक दृष्ट्या सक्षम असल्यामुळे त्याला आरक्षण देता येणार नाही आणि हे ठाऊक असताना सुद्धा सरकारने मराठ्यांना आरक्षण देण्याचा निर्णय घेतला. आता मराठ्यांच्या आरक्षणावरून महाराष्ट्रात जे काही रणकंदन सुरू झाले आहे, त्याचा काय शेवट होईल ते परमेश्वरालाच ठाऊक! मराठा आरक्षणासाठी लढणारे जरांगे पाटील हे खरोखरच प्रामाणिक आहेत. आरक्षणाबाबत त्यांची तळमळ संपूर्ण महाराष्ट्राने पाहिली आहे. म्हणूनच त्यांच्या शब्दावर विश्वास ठेवून संपूर्ण मराठा समाज रस्त्यावर उतरला आहे. अशा वेळी आंदोलनाची ही लढाई लढताना आपण यामध्ये हरणार नाही याची काळजी जरांगेनी घ्यायला हवी होती. पण दुर्दैवाने सरकारने त्यांना एक वेळ फसवून सुद्धा, दुसऱ्या वेळी ते सरकारच्या भूलथापांना बळी पडले आणि त्यांनी सरकारला दोन महिन्याचा अवधी दिला. पण या दोन महिन्यात काहीही होणार नाही. उलट याा दोन महिन्यात सरकारमधल्या पुढाऱ्यांकडून मराठा आंदोलनात फूट पाडली जाईल आणि पुन्हा फसवा फसवीचे खेळ सुरू होतील. त्यासाठी सरकार मधले काही ओबीसी मंत्री ओबीसींना चिथावणी देऊन मैदानात उतरवतील आणि मराठ्यांच्या विरोधात उभे करतील. अशावेळी जरांगे पाटील काय करणार? सरकारमध्ये बसलेल्या पुढाऱ्यांना जरांगे पाटलांना ओळखता आले नाही हीच मराठा आंदोलनाची शोकांतिका आहे. कारण सरसकट सर्वांना कुणबी प्रमाणपत्र देणे कायद्याच्या दृष्टीने सरकारलाही शक्य नाही. परंतु वेळ मारून नेण्यासाठी सरकारने जरांगे पाटलांकडून दोन महिन्याची मुदत घेतली आहे आणि या सगळ्या घडामोडीमध्ये बिचाऱ्या आमच्या गरीब मराठी बांधवांचे हाल होत आहेत. दोन महिन्यांनी काय चित्र असेल हे संपूर्ण महाराष्ट्राला ठाऊक आहे. दोन महिन्यात महाराष्ट्रातील कुणबी समाजाची जनगणना किंवा इम्पेरिकल डेटा मिळवणे शक्यच नाही. त्यामुळे या दोन महिन्यात मराठ्यांना सरसकट कुणबी प्रमाणपत्र देण्याचे सरकारने जे आश्वासन दिलेले आहे, ते सरकारला पूर्ण करता येणार नाही. उलट मराठा आंदोलकांच्या विरोधात ओबीसींना उभे केले जाईल किंवा मराठा समाजातीलच काही लोक आम्हाला कुणबी प्रमाणपत्र नको म्हणून रस्त्यावर उतरतील. त्यानंतर या लोकांमुळे आम्ही २ महिन्यात मराठा आंदोलकांचा प्रश्न सोडवू शकलो नाही, असे सांगून सरकार मोकळे होईल. जर सरकारचा खरोखरच मराठ्यांना सरसकट कुणबी पत्र देण्याचा प्रामाणिक हेतू असता, तर सरकार बरोबर किंवा सरकारमध्ये असलेले काही मराठा नेते आम्हाला कुणबी प्रमाणपत्र नको असे सांगून त्यांनी जरांगे पाटलांच्या आंदोलनाला विरोध केला नसता. म्हणजे मराठा आरक्षणाचे मारेकरी सरकार मध्येच बसलेले आहेत. मग अशा लोकांवर कारवाई करण्याचे धाडस शिंदे आणि त्यांचं सरकार का दाखवत नाही? वास्तविक जेव्हा सरकारचे शिष्टमंडळ दोन न्यायमूर्तींना घेऊन जरांगे पाटलांच्या भेटीला गेले होते, तेव्हा जरांगे पाटलांनी हा मुद्दा या शिष्टमंडळासमोर उपस्थित करायला हवा होता. पण सरकारच्या नो बॉलवर जरांगे पाटलांची विकेट गेली आणि त्यांना गुंडाळण्यात शिष्टमंडळाला यश आले. मराठा आरक्षणाच्या आंदोलनावरून राज्यात जी कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण झालेली आहे, ती आटोक्यात यायला हवी यात वादच नाही. महाराष्ट्र शांत व्हायला हवा. महाराष्ट्रात शांतता नांदायला हवी. कारण मराठा आरक्षणाच्या आंदोलनाचा महाराष्ट्रातील इतर सर्वसामान्य लोकांना फटका बसता नये. लोकांना शांतता हवी आहे. त्यामुळे सर्वपक्षीय बैठकीत ही शांततेची कबुतरे उडवण्यात आली. त्याला संपूर्ण महाराष्ट्राचा पाठिंबा आहे. पण मग आम्हाला कुणबी प्रमाणपत्र नको असे म्हणून मराठा आरक्षणाला विरोध करणाऱ्यांना सर्वपक्षीय बैठकीत का जाब विचारण्यात आला नाही किंवा सरकार मधल्या लोकांनी खास करून मुख्यमंत्र्यांनी अशा लोकांना का जाब विचारला नाही. जे लोक आम्हाला कुणबी प्रमाणपत्र नको असं सांगत आहेत, त्यांच्याकडे हरामचा पैसा आहे. सत्तेत किंवा सत्तेच्या आसपास राहून त्यांनी पुढच्या दहा पिढ्या खातील एवढा पैसा कमवून ठेवलाय. त्यांना कुठल्याही प्रमाणपत्राची आणि आरक्षणाची काय गरज नाही? आणि हेच लोक मराठा आरक्षणाचे कट्टर विरोधक आहेत. त्यामुळे अशा लोकांच्या विरोधात मराठा समाजाने आक्रमक भूमिका घ्यायला हवी. जरांगे पाटील आणि त्याचे सहकारी अशा लोकांना का घाबरतात तेच कळत नाही. कोण आहेत हे लोक? यांना जनमानसात काय किंमत आहे? आणि मराठा समाजाला विरोध करण्याची त्यांना हिम्मत कशी झाली? महायुतीच्या बैठकीत मुख्यमंत्री म्हणाले होते की मराठा आरक्षणाबाबत सर्वांची भूमिका एकाच असायला हवी. मुख्यमंत्र्यांना जर असे वाटत असेल तर मग मराठा आरक्षणात काड्या घालणारे जे लोक तुमच्या सरकारमध्ये, तुमच्या मांडीला मांडी लावून बसलेत, त्यांची कॉलर पकडा ना! का त्यांच्याबाबत बोटचेपी धोरण घेता? की त्यांची भूमिका हीच संपूर्ण महायुतीची भूमिका आहे असे लोकांनी समजायचे? सत्तेतले दोन चार करोडपती मराठा पुढारी म्हणजे संपूर्ण मराठा समाज नाही. आज मराठा समाजातील जो गरीब शेतकरी आहे त्याची अवस्था खूप बिकट आहे. एकीकडे निसर्ग साथ देत नसल्याने शेती व्यवसायातून फार काही मिळत नाही. तर दुसरीकडे पोरा बाळांना जगण्यासाठी दुसरा पर्यायी व्यवसाय नाही. गरीब शेतकऱ्यांची मुले केवळ मराठा आहेत म्हणून ती आर्थिक दृष्ट्या सक्षम आहेत असे चित्र निर्माण करणे चुकीचे आहे. त्यामुळे सर्वात प्रथम हे चित्र पुसून टाकायला हवे. तरच मराठा समाजाची खरी परिस्थिती लोकांसमोर आणि खास करून न्यायपालिके समोर येईल. पण त्यासाठी सरकारची भूमिका आणि प्रामाणिक प्रयत्न असायला हवेत. जरांगे पाटला सारख्या बिचाऱ्या गरीब आणि लढवय्या मराठी माणसाला कशासाठी फसवले जाते तेच कळत नाही. मराठा आरक्षणाबाबतचे संविधानिक वास्तव जरांगे पाटील आणि त्यांच्या सहकाऱ्यांना समजावून सांगण्यात सरकार कमी पडले, म्हणून आज ही परिस्थिती निर्माण झालेली आहे. जी गोष्ट होणारच नाही, ती होईल! असे आश्वासन का दिले जाते. का लोकांची फसवणूक केली जात आहे. अजूनही वेळ गेलेला नाही. सरकारने मराठा आरक्षणाबाबतचे वास्तव लोकांना सांगून टाकावे आणि जर खरोखरच मराठ्यांना आरक्षण द्यायचे असेल तर केंद्रात भाजपचे बहुमताचे सरकार आहे. तिथे कायदा करा. आरक्षणाची टक्केवारी वाढवा आणि त्यातून मराठ्यांना आरक्षण द्या. पण तसे करणार नाही. कारण तसा केंद्राकडे आग्रह धरला तर भविष्यात केंद्रातील नेत्यांची चमचेगिरी करायला मिळणार नाही. केंद्रातील नेत्यांच्या नजरेतून आपण उतरून जाऊ, ही भीती इथल्या पुढाऱ्यांना आहे. त्यामुळे केंद्रासमोर ते मराठा आरक्षणाबाबत आक्रमक भूमिका घेऊ शकत नाही. आणि हीच बाब जरागे पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांच्या लक्षात आलेली नाही. आता सरकारकडून सांगितले जाते की हा केंद्राचा विषय नाही. मग हा जर महाराष्ट्राचा विषय असता तर मागासवर्ग आयोगाने दिलेल्या अहवालानंतर, मुंबई उच्च न्यायालयाने मराठ्यांना शिक्षणात आणि नोकरीत जे आरक्षण दिले होते ते सर्वोच्च न्यायालयात का टिकले नाही? सरकारने मराठा आरक्षणाबाबत विधिमंडळात एकमताने ठराव केला होता ना! पण तो कायद्याच्या कसोटीवर का टिकला नाही. शेवटी सुप्रीम कोर्टात जावे लागले ना! मग आता या देशात सुप्रीम कोण आहे? केंद्र सरकार व सर्वोच्च न्यायालय सुप्रीम आहे ना! असे असताना केंद्र सरकार मराठा आरक्षणाचा प्रश्नात का लक्ष घालत नाही? सरकारला दोन महिन्याची मुदत देणाऱ्या जरांगे पाटलांनी आता तरी या सगळ्या गोष्टीचा विचार करावा. कारण सरकार २ महिन्या नंतरही मराठा आरक्षणाचा प्रश्न सोडवू शकणार नाही. केवळ तुमचे आमरण उपोषण थांबवण्यासाठी त्यांनी वेळ मारून नेलेली आहे. ज्या दिवशी जरांगे पाटील या सगळ्या गोष्टींचा विचार करतील. त्याच दिवशी त्यांना खऱ्या अर्थाने सरकारकडून सुरू असलेली टोलवाटोलवी कळेल.

# युवकांना आर्थिक सक्षम बनविणारी अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाची व्याज परतावा योजना

आर्थिकदृष्ट्या मागास असलेल्या घटकातील, प्रामुख्याने मराठा प्रवर्ग आणि ज्या प्रवर्गासाठी स्वतंत्र महामंडळ अस्तित्त्वात नाही, अशा प्रवर्गातील बेरोजगार युवक-युवतींच्या उद्योग व्यवसायाला हातभार लावून त्यांना सक्षम बनविण्यासाठी अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामार्फत व्याज परतावा योजना राबविल्या जातात. वैयक्तिक कर्ज व्याज परतावा आणि गट कर्ज व्याज परतावा अशा दोन वेगवेगळ्या योजनांचा यामध्ये समावेश आहे. या दोन्ही योजनांची अंमलबजावणी https://udyog.mahaswayam.gov.in या संकेतस्थळाच्या माध्यमातून लोकाभिमुख आणि पारदर्शकपणे होत आहे.

**वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना (आयआर-१)**

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजनेची १० लाख रुपयांवरून १५ लाख रुपयांपर्यंत वाढविण्यात आली आहे. लाभार्थ्यांनी व्यावसायिक अथवा उद्योगासाठी बँकेकडून घेतलेल्या कर्जावर या योजनेंतर्गत ४.५ लाख रुपयेपर्यंत व्याज परतावा करण्यात येतो. व्याज परताव्याचा कालावधी ७ वर्षापर्यंत व व्याजाचा दर दसादशे १२ टक्केपर्यंत आहे.

**गट कर्ज व्याज परतावा योजना (आयआर-२)**

गट कर्ज व्याज परतावा योजनेत किमान दोन किंवा दोन पेक्षा अधिक व्यक्तींच्या गटाने एकत्र येऊन व्यवसाय, उद्योगासाठी कर्ज घेतले असल्यास ५० लाख रुपयापर्यतच्या कर्जावर १२ टक्के दराने व्याज किंवा १५ लाखाच्या मर्यादेत व्याज परतावा दिला जातो. दोन व्यक्तींसाठी २५ लाख, तीन व्यक्तींसाठी ३५ लाख, चार व्यक्तींसाठी ४५ लाख आणि पाच व पाचपेक्षा जास्त व्यक्ती असल्यास ५० लाखपर्यंतच्या व्यवसाय, उद्योग कर्जासाठी या योजनेचा लाभ दिला जातो. या योजनेमध्ये शेतकरी उत्पादक कंपनी गटाने त्यांच्या शेतीपूरक व्यवसायासाठी बँकेमार्फत घेतलेल्या कर्जासाठीही व्याज परतावा दिला जातो.

**व्याज परतावा योजनेचा लाभ घेण्यासाठी या आहेत अटी**

उमेदवार महाराष्ट्राचा रहिवासी असणे अनिवार्य असून या योजना प्रामुख्याने मराठा प्रवर्गासाठी, तसेच ज्या प्रवर्गाकरीता स्वतंत्र महामंडळ अस्तित्त्वात नाही, अशा प्रवर्गासाठी आहे. लाभार्थ्याचे कौटुंबिक वार्षिक उत्पन्न ८ लाख रुपयांच्या आत असणे आवश्यक आहे. त्याबाबत तहसीलदार यांचे प्रमाणपत्र किंवा पती-पत्नी यांचे आयकर परतावा प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी महाराष्ट्राच्या भौगोलिक क्षेत्रात स्थायिक, कार्यरत असलेल्या बँकेकडून कर्ज घेणे अनिवार्य आहे. गट कर्ज व्याज परतावा योजनेमध्ये कमाल वयोमर्यादेचे बंधन राहणार नाही. तसेच गट कर्ज व्याज परतावा योजनेत भागीदारी संस्था, सहकारी संस्था, बचत गट, एल.एल.पी., कंपनी कायद्याअंतर्गत नोंदणीकृत संस्था व इतर शासन नोंदणीकृत गट, संस्था लाभास पात्र असतील. महामंडळाच्या योजनांतर्गत फक्त व्यवसाय/ उद्योगाकरीता घेतलेल्या कर्जावरील व्याज परतावा करण्यात येतो. यासाठी २१ नोव्हेंबर २०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार योजनेची अंमलबजावणी केली जाते.

**व्याज परतावा योजनांचा लाभ घेण्यासाठी प्रथम एलओआय प्राप्त करणे आवश्यक**

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या व्याज परतावा योजनांचा लाभ घेण्यासाठी सर्वप्रथम एलओआय' म्हणजेच पात्रता प्रमाणपत्र प्राप्त करून घेणे आवश्यक आहे. या प्रमाणपत्रासाठी आधारकार्ड (अपडेटेड मोबाईल क्रमांक व स्वतःच्या ई-मेल आयडीसह), रहिवासी दाखला, वीज देयक, शिधापत्रिका, गॅस देयक, बँक पासबुक यापैकी एक रहिवासी पुरावा, उत्पन्नाचा दाखला किंवा आयकर परतावा प्रमाणपत्र (विवाहित असल्यास पती-पत्नी यांचा व अविवाहित असल्यास स्वतःचे आयकर परतावा प्रमाणपत्र), जातीचा दाखला किंवा शाळा सोडल्याचा दाखला आणि एक पानी प्रकल्प अहवाल सादर करणे आवश्यक आहे. या अहवालाचा नमुना अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या https://udyog.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

पात्रता प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर त्यासमवेत लाभार्थ्याने त्याला करावयाचा असलेल्या व्यवसायाचा, उद्योगाचा प्रकल्प अहवाल (आवश्यक ते सर्व कागदपत्र) घेऊन त्यांच्या कार्यक्षेत्रातील कोणत्याही बँकेमध्ये कर्ज प्रकरण दाखल करावे. बँकेने कर्ज मंजुर केल्यानंतर कर्ज मंजूरीबाबतची आवश्यक सर्व माहिती संबंधिताने वेबप्रणालीवर सादर करावी. यामध्ये ज्या खात्यामध्ये व्याज परतावा हवा आहे त्याचा तपशील, बँक कर्ज मंजुरी पत्र, बँकेमार्फत वितरीत करण्य कर्जाचा पुरावा (बँक स्टेटमेंट), बँक ईएमआय वेळापत्रक (त्यावर वसुलीचा दिनांक असणे अनिवार्य), प्रकल्प अहवाल, हफ्ता भरल्याबाबतचा पुरावा आदी बाबींचा समावेश असावा.

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या योजनांच्या लाभासाठी कोणत्याही सहकार्याची आवश्यकता असल्यास महामंडळाच्या जिल्हा समन्वयकांना संपर्क साधावा. सर्व जिल्हा समन्वयकांचे संपर्क वेब प्रणालीवर उपलब्ध करुन देण्यात आला आहे. या योजनांच्या सहाय्यासाठी महामंडळाचे मुंबई मुख्यालय व जिल्हानिहाय जिल्हा समन्वयकांशिवाय इतर कोणत्याही व्यक्तीशी याबाबत संपर्क साधू नये. तसेच कोणत्याही खाजगी व्यक्ती, संस्थेच्या अमिषाला बळी पडू नये, असे आवाहन अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामार्फत करण्यात आले आहे.

**- तानाजी घोलप, माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय, लातूर**

# मीटर टॅक्सी व ऑटोरिक्षा यांची वयोमर्यादा निश्चित

**पालघर/प्रतिनिधी**

राज्य परिवहन प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे दि. २९/०४/२०१३ रोजीच्या बैठकीतील ठराव क्र.०७/२०१३ नुसार मुंबई महानगर क्षेत्रातील मीटर टॅक्सी प्रथम नोंदणी दिनांकापासून २० वर्षे व ऑटोरिक्षा १६ वर्षापर्यंत अशी वयोमर्यादा निश्चित करण्यात आली. दि. ०१/०८/२०१४ रोजी शासनाने पूर्वीच्या ठाणे जिल्ह्याचे विभाजन करून पालघर जिल्ह्याची निर्मिती केली, परंतु तत्पूर्वी १७/०८/२०१० साली शासनाने प्रादेशिक परिवहन कार्यालय, ठाणे याचे विभाजन करून उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, वसई या कार्यालयाची निर्मिती करण्यास मान्यता दिली होती.मा. अपर परिवहन आयुक्त तथा सचिव राज्य परिवहन प्राधिकरण यांनी त्यांचे दि. २९/०७/२०१३ रोजीच्या पत्रानुसार सर्व प्राधिकारी परिवहन अधिकारी / उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांना सदर ठरावाची प्रत राज्यातील उर्वरित प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाना माहिती व मार्गदर्शनार्थ पाठविण्यात आली होती. परंतु पालघर जिल्ह्याची निर्मिती झाल्यापासून पालघर जिल्ह्यामध्ये स्वतंत्र प्रादेशिक परिवहन प्राधिकरण स्थापन झालेले नव्हते त्यामुळे प्रादेशिक परिवहन प्राधिकरण ठाणे यांचे निर्णयाप्रमाणे सद्यस्थितीत अंमलबजावणी करण्यात येत होती. पालघर जिल्ह्यासाठी स्वतंत्र प्रादेशिक परिवहन प्राधिकरणचा प्रस्ताव दि. १४/०७/२०२२ रोजी परिवहन आयुक्त महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना पाठविण्यात आलेला आहे. त्यानुसार दिनांक १६/१०/२०२३ रोजीच्या महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाच्या अधिसूचनेनुसार प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे.

प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, पालघर जिल्हा (मुंबई महानगर क्षेत्र वगळून) यांची पहिली बैठक दिनांक २६/१०/२०२३ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर येथे पार पडली. सदर बैठकीस अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी गोविंद बोडके, सदस्य पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील, सदस्य-सचिव उप प्रादेशिक परिवहन अधिकारी दशरथ वाघुले इत्यादी मान्यवर यावेळी उपस्थित होते. सदस्य सचिव तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, वसई यांनी अध्यक्ष व सदस्य याना प्राधिकरणाबाबत सविस्तर माहिती दिली. पालघर जिल्ह्यातील वसई व पालघर तालुके हे मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरणात मोडत असून उर्वरित तालुके डहाणू, तलासरी, जव्हार, वाडा, मोखाडा, विक्रमगड, हे तालुके मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरण वगळून मोडत आहे. नवनिर्माण रिक्षा टॅक्सी, टेम्पो चालक मालक संघटना, विरार पूर्व यांच्या दि. २४/०७/२०२३ रोजीच्या निवेदनानुसार जिल्हाधिकारी गोविंद बोडके यांच्या अध्यक्षतेखाली दि. २३/०८/२०२३ रोजी पार पडलेल्या बैठकीतील निर्देशानुसार इतर प्रादेशिक परिवहन प्राधिकरणामध्ये सहा आसनी,तीन चाकी ऑटोरिक्षा प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांच्या वयोमर्यादेबाबतची सद्यस्थितीचा आढावा घेण्याबाबत निर्देश देण्यात आले होते, त्यानुसार प्रादेशिक परिवहन प्राधिकरण ठाणे, नाशिक, पुणे, सांगली, सातारा, पेण यांनी घेतलेल्या निर्णयाची माहिती घेण्यात आली. नवनिर्माण रिक्षा टेक्सी टेम्पो चालक मालक संघटना, विरार पूर्व व उत्तर कोकण ऑटो चालक मालक टेक्सी संघटना, वाडा यांच्या निवेदनातील मुद्देविचारात घेण्यात येऊन त्यादृष्टीने वाहनांमुळे होणारे प्रदूषण, वाहनाची तांत्रिक दृष्ट्या असणारी योग्यता, रस्ता सुरक्षा दृष्टीने अपघात होऊ नयेत तसेच राज्यातील इतर जिल्ह्यातील प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाचे निर्णय यासंबंधी सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीतील निर्णयानुसार इतर प्रादेशिक परिवहन प्राधिकरण यांच्या वयोमर्यादेबाबतच्या निर्णयाचे अवलोकन करून सखोल चर्चा करून प्राधिकरणाने पालघर जिल्ह्यातील मुंबई महानगर क्षेत्र वगळून उर्वरीत पालघर जिल्ह्यात परवान्यावर चालणाऱ्या मिनीडोअर तीन चाकी सहा आसनी प्रवासी रीक्षांची वयोमर्यादा नोंदणी दिनांकापासून २० वर्ष इतकी निश्चित करण्यात आली. वरील निर्णयाची अंमलबजावणी दि. ०१/११/२०२३ पासून करण्यात आली आहे.

# महिला आर्थिक विकास महामंडळा मार्फत दिवाळी मेळाव्याचे आयोजन

**पालघर/प्रतिनिधी**



महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम), जिल्हा कार्यालय पालघर नवतेजस्विनी महाराष्ट्र महिला व उद्यम विकास प्रकल्प व नगरपरिषद पालघर यांच्या संयुक्त विद्यमानाने माहे नोव्हेंबर, २०२३ मधील येणा-या दिवाळीच्या मुहूर्तावर पालघर जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील बचत गटांनी तयार केलेल्या वस्तू जसे पणत्या, दिवे, दिवाळीचा फराळ, रांगोळया इत्यादी वस्तूंची विक्री करण्याकरीता दिनांक ०७ ते ०९ नोव्हेंबर, २०२३या कालावधीमध्ये तीन दिवसीय जिल्हास्तरावर दिवाळी मेळाव्याचे आयोजन हुतात्मा स्मारक, तहसील कार्यालय पालघरच्या शेजारी ता. जि. पालघर येथे करण्यात येणार आहे. महिला बचत गटांनी तयार केलेल्या उत्पादनांना बाजारपेठ मिळावी हा प्रामुख्याने उद्देश असेल, सदर दिवाळी मेळावा हा ३ दिवसाचा असणार आहे. त्याकरिता एकूण २० स्टॉल उभारण्यात येणार आहेत. स्टॉलमध्ये बचत गटाच्या दिवाळी निमित्ताने बनविण्यात आलेल्या खाद्यपदार्थ वस्तूंची विक्री करण्यासोबत इतर सेक्शनचा समावेश असेल. उदा. ह्यांडीक्राफ्ट, गारमेंट, धान्य, कडधान्य इत्यादी. सदरील दिवाळी मेळाव्याचे उद्घाटन दि. ०७/११/२०२३ रोजी सकाळी ११:०० वा. डॉ. उज्वला केदार काळे, नगराध्यक्ष, नगरपरिषद पालघर यांच्या हस्ते होणार असून या प्रसंगी प्रमुख अतिथी डॉ. पंकज पवार / पाटील, मुख्याधिकारी, नगरपरिषद पालघर, प्रविण भावसार, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पालघर, मल्लिनाथ कांबळे, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, विक्रांत पाटील, अग्रणी बँक अधिकारी, बँक ऑफ महाराष्ट्र आणि मंगेश पाटील, शहर अभियान व्यवस्थापक, नगरपरिषद पालघर उपस्थित असणार आहेत. महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम), जिल्हा कार्यालय पालघर अंतर्गत महिला सक्षमीकर्णाचे काम सुरु असून पालघर जिल्ह्यात माहे ऑक्टोबर, २०२३ अखेर वाडा तालुक्यात ६५८ बचत गट, पालघर तालुक्यात ६२० बचत गट, मोखाडा तालुक्यात १४६ बचत गट, विक्रमगड तालुक्यात ५२ बचत गट, डहाणू तालुक्यात १५ बचत गट, तलासरी तालुक्यात २० बचत गट, वसई विरार महानगरपालिका १०९३ बचत गट, जव्हार नगरपरिषदेत १५२ बचत गट आणि मिरा भाईंदर महानगरपालिकेत ६०२ बचत गट असे एकूण ३३५८ बचत गट ग्रामीण व शहरी भागात माविमच्या माध्यमातून कार्यरत असून ३६९५० महिला संघटन या माध्यमातून तयार झालेले आहे. मार्च २०२३ अखेर २३२६ बचत गटांना २५ कोटी १० लाख रुपये बँकाकडून कर्ज मिळाले असून एप्रिल २०२३ ते ऑक्टोबर, २०२३ या कालावधीत ५०७ बचत गटांना ९ कोटी ५० लाख रुपये बँकाकडून कर्ज उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. त्याचबरोबर जिल्हा उद्योग केंद्राच्या माध्यमातून उचएत्रझ या योजनेच्या माध्यमातून ३५६ लाभार्थ्यांना रुपये २ कोटी १६ लाख कर्ज उपलब्ध करून देण्यात आलेले आहे. त्याचबरोबर मानव विकास मिशन, पालघर अंतर्गत ४७० बचत गटांना शेती अवजारे, ग्रेडिंग व फूड प्रोसेसिंग, कृषी विषयक मशिनरी, व्हाईट राईस युनिट, कॉमन फॅसिलीटी सेंटर, मिनी राईस मिल इ. योजनांचा लाभ ४७०० लाभार्थी महिलांना आज अखेर लाभ मिळाला आहे.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून प्रकाशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : ॲड.अनिल सांडभोर. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

06 TO 12 NOVEMBER 2023 - Page 5 (CRIME SANDHYA):Layout 1 11/4/2023 10:09 PM Page 1



### लातूर येथील वसंतराव काळे खाजगी माध्यमिक शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या

# चेअरमन पदी आमदार विक्रम काळे तर व्हाईस चेअरमन पदी युवराज शिंदेंची निवड



**देवणी/प्रतिनिधी**

लातूर येथील वसंतराव काळे खाजगी माध्यमिक शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या चेअरमन पदी आमदार विक्रम काळे तर व्हाईस चेअरमन पदी युवराज शिंदे यांची गुरुवारी बिनविरोध निवड करण्यात आली आहे. अध्याशी निवडणूक निर्णय अधिकारी श्रीमती जे. एस. गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली पतसंस्थेच्या कार्यालयात नूतन संचालकांची बैठक होऊन ही निवड करण्यात आली. तसेच पतसंस्थेच्या सचिव पदी गफार सय्यद, यांची तर खजिनदार पदी राजाराम भिसे यांची निवड करण्यात आली. पतसंस्थेच्या संचालक मंडळाची निवडणूक २०२३ ते २०२८ या वर्षातील ११ संचालक मंडळासाठी निवडणूक कार्यक्रम झाला होता. यानुसार ११ जागांसाठी ११ उमेदवारी अर्ज दाखल केल्याने ११ उमेदवाराचे अर्ज मंजूर झाल्याने निवडणूक बिनविरोध घोषित करण्यात आली आहे. यानुसार नवीन पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. नूतन चेअरमन व्हाईस चेअरमन, सचिव, खजिनदार यांचा संचालक मंडळाच्या वतीने सत्कार करून त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. या बैठकीस नूतन संचालक आमदार विक्रम काळे, युवराज शिंदे, राजाराम भिसे, बंडू खोसे, भाऊसाहेब भिसे, राजकुमार जाधव, दत्ता कवडे, गफार सय्यद, महिला प्रतिनिधी सुरेखा दाडगे, वैशाली फुले ज्योती तेलंगे, गंगाधर आरडले, व्यवस्थापक राजाभाऊ सरडे हे उपस्थित होते. पतसंस्थेचे कार्यक्षेत्र लातूर जिल्हा असून कर्ज मर्यादा २५ लाख एवढी आहे.

# विरार डहाणू चौपदरी रेल्वेचा मार्ग मोकळा-केदार काळे

**पालघर/एच. लोखंडे**





मुंबई रेल्वे विकास महामंडळाच्या विरार - डहाणू चौपदरी प्रकल्पात येणारी रेल्वे मार्गालगत असलेली २४.५ हेक्टर जमिनीवरील खारफुटी हटवण्यासाठी. माननीय मुंबई उच्च न्यायालयाने मंजुरी दिली आहे. या अनुषंगाने विरार- डहाणू रेल्वे स्टेशन दरम्यान रेल्वेचे चौपदरीकरण करण्याचे रखडलेले काम जलद व वेगाने चालू होईल अशी आशा निर्माण झाली आहे. सदर रेल्वे मार्गाच्या चौपदरीकरण कामासाठी अंदाजे एकूण २४, ३०३ खारफुटीची तोड होणार आहे. तर या बदल्यात पालघर जवळील तीन गावांमध्ये ५४ हेक्टर जमिनीवर मुंबई रेल्वे विकास महामंडळ वनीकरण करणार आहे. अशी माहिती मिळून येत आहे. डहाणू- विरार मार्गावर चार रेल्वे लाईन झाल्यामुळे डहाणू , वाणगाव, बोईसर, उमरोळी, पालघर, केळवे, सफाळे, वैतरणा या रेल्वे स्टेशन वरून दैनंदिन प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी खूप मोठी सोय होणार आहे. या चार रेल्वे लाईन मधील दोन रेल्वे लाईन लोकलसाठी असतील तर दोन रेल्वे लाईन मेल एक्सप्रेस आदी जलद जाणाऱ्या रेल्वे गाड्या साठी असणार आहे. भविष्यात डहाणू - चर्चगेट - डहाणू विरार येणाऱ्या जाणाऱ्या लोकलच्या संख्येत वाढ होणार असून, लोकल गाड्यांचा वेग वाढणार व ज्या लोकलगाड्या साईडला काढण्यात येतात. त्याची गरज भासणार नाही. यामुळे मुंबईला जाणाऱ्या येणाऱ्या प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे. तसेच वैतरणा ते डहाणू पर्यतच्या रेल्वे स्टेशन व त्या लगत असलेल्या शहरांचा विकास मोठ्या प्रमाणात होणार आहे. सदर प्रकल्पासाठी अंदाजे ३५७८ कोटी रुपये खर्च येणार असून, या प्रकल्पाचे २२% टक्के काम पूर्णही झाले आहे. सन २०२५ पर्यत हा प्रकल्प पूर्ण होऊन दैनंदिन रेल्वे प्रवाशांना मोठ्या प्रमाणात फायदा/ दिलासा मिळणार आहे, श्री. केदार काळे - शिवसेनेचे प्रवक्ते व डी आर यु सी सदस्य पश्चिम रेल्वे मुंबई सेंट्रल विभाग केदार काळे - पालघर, यांच्या कडून मिळत आहे.

# कुख्यात भामटे अजय-विजय गजाआड फसवणुकीच्या तब्बल ६३ गुन्ह्यांची नोंद

**विरार/प्रतिनिधी**



रस्त्यात नागरिकांना बोलण्यात गुंतवून हातचलाखीने त्यांच्या कडील पैसे आणि ऐवज लुटणार्या अजय-विजय या कुख्यात भामट्यांच्या जोडगोळीला अखेर विरार पोलिसांनी गजाआड केले आहे. त्यांच्याकडून ५ गुन्ह्यांची उकल करण्यात आली आहे. या दोघांवर तब्बल ६३ फसवणुकीच्या गुन्ह्यांची नोंद आहे. रस्त्यात एकट्याने जाणाऱ्या नागरिकांना विजय तांबे (५३) आणि अजय सावंत (५०) हे दोन भामटे गाठायचे. 'काय मला ओळखतोस का?' अशी सुरूवात करून हे दोघे भामटे अनोळखी व्यक्तीला बोलण्यात गुंतवायचे. समोरच्या व्यक्तीला काही कळण्याच्या आतच त्याच्याकडील मौल्यवान दागिने आणि रोख रक्कम हातचलाखीने काढून पसार व्हायचे. अजय-विजय नावाची ही भामट्यांची जोडगोळी नावाने कुप्रसिध्द होती. या जोडगोळीने वसई विरारमधील नागरिकांना गंडा घालण्यास सुरूवात केली होती. विरार पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेने सीसीटीव्ही आणि इतर तांत्रिक बाबींचा तपास करून दोघांना अटक केली. त्यांच्याकडून ठाणे आणि मुंबईतील ४ गुन्ह्यांची उकल करण्यात आली आहे. यातील विजय तांबे याच्याविरोधात मुंबई आणि परिसरातील विविध पोलीस ठाण्यांत ५३ तर अजय सावंत याच्यावर १३ गुन्ह्यांची नोंद आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कांबळे यांच्या नेतृत्वाखाली पोलीस निरीक्षक अभिजित मडके, गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर फडतरे, सचिन लोखंडे, संदीप जाधव, विशाल लोहार, इंद्रनील पाटील, सचिन शेरमाळे, योगेश नागरे, सचिन बळीद, बावाजी गायकवाड आदींच्या पथकाने या दोघांना अटक करण्यात यश मिळवले.

# भिवंडीत सोन साखळी चोरट्यांना अटक, तब्बल २८ तोळे सोने केले जप्त



**भिवंडी/प्रतिनिधी**

भिवंडी शहरामध्ये मागील काही दिवसांपासून सोनसाखळी चोरीच्या घटनांमध्ये प्रकर्षाने वाढ झालेली असताना पोलीस उपायुक्त नवनाथ ढवळे यांनी पोलिसांना आपापल्या क्षेत्रामध्ये गस्त वाढवून नाकाबंदी करण्याचे आदेश दिले होते.या कारवाईला यश आले असून भिवंडी शहर पोलिस ठाण्यातील गणेश हरणे व लहू गावित या दोघा पोलिसांनी पाठलाग करून त्यांना पकडून त्यांच्या ताब्यातून ८ लाख ६१ हजार रुपये किमतीचे २८ तोळे सोने व ५० हजार रुपये किमतीची एक दुचाकी असा मुद्देमाल जप्त करून नऊ गुन्हे उघडकीस आणून.चोरीचे सोने विकण्यासाठी मदत करणारा सहकारी असे तिघा जणांना पोलिसांनी अटक केली आहे अशी माहिती पोलिस उपायुक्त नवनाथ ढवळे यांनी पत्रकार परिषदेत दिली आहे. सोनु गोविंद पाल वय २८ रा.उल्हासनगर, कमलाकर गपणत डोंगरे वय ३६ रा. बोरपाडा व सहकारी स्वप्नील गजानन हरड, वय ३० रा. टिटवाळा, कल्याण असे अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत.

भिवंडी शहरात वाढत्या सोनसाखळी चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी सहाय्यक पोलीस आयुक्त दीपक देशमुख, वरिष्ठ पोलीस निरीक्षक चेतन काकडे, पोलिस निरीक्षक दीपक कदम यांच्या मार्गदर्शनाखाली गणेश हरणे व लहू गावित हे गस्त घालीत असताना पद्मानगर भागात दोघे संशयित दुचाकी वरून जाताना आढळून आल्याने दोघांनी त्यांच्या दुचाकीस ठोकर मारून पकडण्या साठी पाडले असता एक चोर ताब्यात आला तर एक जण जवळच असलेल्या इमारतीच्या टेरेस वरून पोलिसांच्या डोळ्यात मिर्ची पावडर स्प्रे मारून पळून जात असताना पोलिसांनी त्यास इमारतीच्या डक मधून उतरत असताना पकडले. त्यांच्या जवळ कसून चौकशी केली असता शहर पोलिस ठाणे हद्दीतील आठ व मानपाडा पोलिस ठाणे हद्दीतील एक अशा नऊ गुन्ह्यांची उकल केली. त्यांनी चोरी केलेल्या सोन्याचा तपास घेतला असता त्यांनी चोरलेले सोने आपला साथीदार स्वप्नील गजानन हरड यांच्या मार्फत नाशिक जिल्ह्यातील घोटी येथे श्री साईसंत ज्वेलर्स याला विकल्याचे कबूल केल्याने पोलिसांनी ८ लाख ६१हजार रुपये किमतीचे २८ तोळे सोने व गुन्हे करण्यासाठी वापरलेली ५० हजार किमतीची दुचाकी जप्त केली आहे. विशेष म्हणजे पोलिसांनी पकडलेले दोघे सोनसाखळी चोरटे हे सराईत गुन्हेगार असून सोनु गोविंद पाल या सेल्समन चा व्यवसाय करणाऱ्यावर विविध पोलिस ठाण्यात १९ तर कुरिअर बॉय म्हणून काम करणाऱ्या कमलाकर गपणत डोंगरे यावर नऊ गुन्ह्यांची नोंद आहे अशी माहिती पोलिस उपायुक्त नवनाथ ढवळे यांनी दिली आहे. पोलिस शिपाई गणेश हरणे व लहू गावित यांचा या यशस्वी कामगिरीबद्दल पोलिस उपायुक्त नवनाथ ढवळे यांनी सन्मान केला असून पोलिस आयुक्त यांनी बक्षीस जाहीर केले आहे.

# लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची जनजागृती सभा




**वाडा/प्रतिनिधी**

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पालघरच्या दक्षता जनजागृती सप्ताहा निमित्त वाडा पोलीस ठाणे येथे बुधवारी (दि.१ नोव्हेंबर) विशेष बैठकीचे आयोजन केले होते. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस उपाधीक्षक दयानंद गावडे यांनी नागरिकांना मार्गदर्शन केले. लाच देणे व लाच घेणे हे कायद्याने गुन्हा आहे, एखादा लोकसेवक तुमच्याकडे एखाद्या कामासाठी तुमच्याकडे पैश्यांची मागणी करत असेल तर त्याच्या विरोधात तुम्ही लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार करू शकता तक्रार दाराचे नाव गुपित ठेवले जाते, त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांनी निर्भीडपणे तक्रार देऊन लाचलुचपत प्रतिबंधक विभागाला सहकार्य करण्याचे आवाहन गावडे यांनी केले.याप्रसंगी नागरिकांनी विचारलेल्या शंकांचे समाधानहि गावडे यांनी केले. पोलीस निरीक्षक सुरेश कदम व नायब तहसीलदार सुनिल लहांगे यांनीही नागरिकांना मार्गदर्शन करून भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन केले. सदर बैठकीस जेष्ठ नागरिक, पोलीस पाटील, पोलीस अधिकारी व पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

# शासकीय सेवेत सामावून घेण्यासाठी कंत्राटी कर्मचाऱ्यांचे काम बंद आंदोलन



**वाडा/प्रतिनिधी**

राष्ट्रीय आरोग्य अभियांनाअंतर्गत कार्यरत अधिकारी कर्मचारी (तांत्रिक व अंतांत्रिक) जिल्हा पालघर यांचे दिनांक २७ ऑक्टोबर पासुन शासकिय सेवेत बिनशर्त समायोजन करणेकरिता कामबंद आंदोलन पुकारले आहे. सदरील आंदोलनामध्ये राष्ट्रीय आरोग्य अभियांन कंत्राटी अधिकारी कर्मचारी (तांत्रिक व अंतांत्रिक) समायोजन कृती समितीचे पदाधिकारी यांना आरोग्य मंत्री, तानाजी सावंत, महाराष्ट्र राज्य यांच्या दालनामध्ये चर्चेसाठी बोलावण्यात आले होते. आरोग्य मंत्री, तानाजी सावंत, महाराष्ट्र राज्य यांनी आझाद मैदान, मुंबई येथील आंदोलनाच्या ठिकाणी भेट देऊन राष्ट्रीय आरोग्य अभियांनाअंतर्गत कार्यरत अधिकारी कर्मचारी (तांत्रिक व अंतांत्रिक) यांचे शासन सेवेत समायोजन करणेकरिता आश्वासन देण्यात आले आहे. राष्ट्रीय आरोग्य अभियांन कंत्राटी अधिकारी कर्मचारी (तांत्रिक व अंतांत्रिक) समायोजन कृती समिती महाराष्ट्र राज्य, पदाधिकारी यांनी आरोग्य मंत्री महोदय यांचे आश्वासन लेखी स्वरुपात आल्याशिवाय आंदोलन मागे घेण्यात येणार नाही असे आव्हान केले आहे त्यानुसार पालघर जिल्ह्यातील सर्व कंत्राटी अधिकारी व कर्मचारी यांनी महाराष्ट्र शासनाने कायमस्वरुपी समायोजनाचे लेखी निवेदन येईपर्यंत कामबंद आंदोलन यापुढे सुरु ठेवण्यात येणार असल्याचे निवेदन वाडा ग्रामीण रुग्णालयतील कर्मचाऱ्यांनी वैद्यकीय अधीक्षक डॉ. विश्वनाथ दासरे यांना निवेदन दिले आहे.

## मनपाच्या कचरा गाडीने दुचाकीला उडवले; अपघातात तरुणाच्या शरीराचे दोन तुकडे



**नालासोपारा/प्रतिनिधी**

३७ वर्षीय दुचाकीस्वाराला गुरुवारी दुपारी मनपाच्या कचरा गाडीने उडवले. या अपघातात दुचाकीस्वाराच्या शरीराचे दोन तुकडे झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या घटनेची माहिती मिळताच वालीव पोलिसांनी धाव घेऊन मृतदेह ताब्यात घेतला आणि पंचनामा करून शवविच्छेदनासाठी पाठवला आहे. वालीव पोलिसांनी कचरा गाडीवरील आरोपी चालकाविरोधात वेगवेगळ्या कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. राजावली परिसरात राहणारे राजेश शंकर मोर (३७) हे गुरुवारी दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास दुचाकीने चिंचोटीवरून राजवली येथील घरी येत होते. अग्रवाल नाक्याजवळ रेंज ऑफिसकडे जाणाऱ्या रस्त्यावर तिरुपती इंडस्ट्रीच्या गेटसमोर वसई-विरार मनपाच्या कचरा गाडीवरील चालकाने ताब्यातील वाहन अविचाराने, हयगईने व वाहतुकीच्या नियमाकडे दुर्लक्ष करून भरधाव वेगात चालविल्यामुळे दुचाकीला जोरदार ठोकर मारली. या अपघातात राजेश यांच्या पोटाचा चेंदामेंदा होऊन शरीराचे दोन तुकडे झाले. तसेच, अतिरक्तस्राव झाल्याने घटनास्थळी मृत्यू झाला आहे.

# विरार मनवेलपाडा येथील दुर्दैवी घटना छताचा स्लॅब अंगावर पडल्याने तरुणीचा मृत्यू

**विरार/प्रतिनिधी**





विरारमध्ये एका इमारतीच्या बेडरूम मधील छताचा स्लॅब अंगावर पडल्याने एका तरुणीचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. बुधवारी रात्री ही दुर्घटना घडली. विरार पूर्वेच्या मनवेल पाडा येथील सी. एम. नंगर येथे दादू प्लाझा इमारत आहे. ही इमारत १० वर्ष जुनी आहे. या इमारतीच्या पहिल्या मजल्यावरील १०२ क्रमांकाच्या सदनिकेत पवार कुटुंबिय राहतात. पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. विरारमध्ये बेडरूम मधील छताचा स्लॅप अंगावर पडल्याने एका तरुणीचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. विरार पूर्व मनवेलपाडा रॉयल पब्लिक स्कूल जवळ, सी एम नंगर येथे असलेल्या दादू प्लाझा इमारतीतील ही घटना आहे. रूम नंबर १०२ मध्ये राहणाऱ्या शितल शिवाजी पवार (वय ३४) ही तरुणी एक नोव्हेंबर रोजी संध्याकाळी आठच्या सुमारास घरात बेडरूममध्ये झोपलेली असताना बेडरूमच्या छताचा स्लॅबचा काही भाग तिच्या अंगावर कोसळून ती गंभीर जखमी झाली होती. त्यानंतर तिला तात्काळ विरार पूर्व चंदनसार येथील श्री जीवदानी हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी नेण्यात आले. तेथे उपचारादरम्यान शितल हिचा मृत्यू झाला. या प्रकरणी तिचे नातेवाईक अमित सोलंकी यांनी बुधवारी विरार पोलीस ठाण्यात दिलेल्या माहितीनुसार पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. सदर दादू प्लाझा ही इमारत दहा वर्षे जुनी असल्याची माहिती समोर येत आहे.

## महाराष्ट्र फेडरेशन ऑफ वूमन लॉयर्सच्या अध्यक्षपदी ॲड. जयश्रीताई पाटील

**लातूर/प्रतिनिधी**



लातूरच्या ज्येष्ठ महिला विधिज्ञ ॲड. जयश्रीताई संभाजीराव पाटील यांची महाराष्ट्र फेडरेशन ऑफ वूमन लॉयर्सच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली असून त्यांनी नुकताच अध्यक्षपदाचा पदभार स्वीकारला आहे. महाराष्ट्र फेडरेशन ऑफ वूमेन लॉयर्सच्या महिला वकील परिषदेची स्थापना पुण्यात दि. ८ मार्च २००८ या जागतिक महिला दिनी करण्यात आली आहे. परिषदेच्या स्थापनेपासून संघटनेचे अध्यक्षपद मुंबई, पुणे, नाशिकच्या महिला वकिलांकडे होते. ऑक्टोबरमध्ये नुकत्याच पार पडलेल्या परिषदेच्या निवडणुकीमध्ये ॲड.जयश्रीताई पाटील यांच्या रूपाने ही जबाबदारी प्रथमच लातूर - मराठवाड्याकडे आली आहे. ॲड.जयश्रीताई पाटील यांनी नुकताच या पदाचा पदभार महाराष्ट्र फेडरेशन ऑफ वूमेन लॉयर्सच्या (एमएफडब्ल्यूएल)च्या पहिल्या अध्यक्षा ॲड. साधना शहा, माजी अध्यक्षा ॲड. जयश्री अकोलकर, ॲड. निलिमा वर्तक, उपाध्यक्षा ॲड. वैशाली खाडे, ॲड. सुजाता तांबे, सचिव ॲड. राजकुमारी राय, सहसचिव ॲड. सीमा बिठाने, कोषाध्यक्षा ॲड. विद्या पेलपकर, लातूरच्या सहकारी ॲड. अरुणा वाघमारे यांच्या उपस्थितीत स्विकारला. या निवडणुकीसाठी ॲड. जयश्रीताई पाटील यांना एमएफडब्ल्यूएलच्या लातूर येथील सदस्या व पदाधिकारी ॲड. सुनंदा इंगळे, ॲड. किरण चिंते, ॲड. सुरेखा जानते, ॲड. पद्मा परमा, ॲड. लता बदने, ॲड. बबिता संकाये, ॲड. रानू रकटे, ॲड. कल्पना भूरे, ॲड. सुमेधा शिंदे, ॲड. देवताळकर, ॲड.चारुशिला पाटील यांनी सहकार्य केले. एमएफडब्ल्यूएल ही संघटना महिला विधिज्ञांसह महिला, लहान मुले यांच्याकरिता राज्यात कर करते. या संघटनेचे प्रदेशाध्यक्षपद ॲड.जयश्रीताई पाटील यांच्याकडे आल्याने विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

## वाडा तालुक्यात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा पद वाटप सोहळा संपन्न

**वाडा/प्रतिनिधी**



वाडा तालुक्यातील ८४ ग्रामपंचायती मधील ८४ मनसेच्या शाखा अध्यक्ष यांची नियुक्ती केली व अनेक महिला आघाडी नियुक्त्या झाल्या. या मेळाव्यास मनसे व मनविसेनेचे शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते. प्रामुख्याने महिला व तरुण कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. बऱ्याच कार्यकर्त्यांनी आपल्या भागातील प्रश्न व मनोगत उपस्थितांन समोर मांडले आणि जिल्हाध्यक्ष अविनाश जाधव यांच्या उपस्थितीत अनेक प्रश्न उपस्थित केले. रविवारी (दि.२९ ऑक्टोबर) वाडा शहरतील पठारे मंगल कार्यालय येथे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा भव्य पद वाटप व कार्यकर्ता मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. ठाणे पालघर जिल्हाध्यक्ष अविनाश जाधव, प्रदेश उपाध्यक्ष डि.के म्हात्रे, भिवंडी लोकसभा अध्यक्ष शैलेश बिडवी, पालघर ग्रामीण जिल्हाध्यक्ष भावेश चुरी, ठाणे ग्रामीण जिल्हा संघटक मदन पाटील, विक्रमगड विधानसभा अध्यक्ष संदेश पडवळे, महिला आघाडी पालघर जिल्हाध्यक्ष प्रीती नाईक यांच्या प्रमुख उपस्थितीत तालुका अध्यक्ष कांतीकुमार ठाकरे यांच्या नेतृत्वा खाली मनसे तालुका कार्यकर्ता मार्गदर्शन व पद नियुक्ती मेळावा संपन्न झाला.

06 TO 12 NOVEMBER 2023 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 11/4/2023 10:10 PM Page 1



# रस्त्या लगतच्या गटारीच्या कामांचा शुभारंभ



**वाडा/प्रतिनिधी**

वाडा शहरतील छत्रपती शिवाजी महाराज नगर येथील काही भाग सखल भाग असल्याने व पावसाच्या पाण्याचा योग्य निचारा होत नसल्याने दरवर्षी पावसाळ्यात अशोक वन, पंचायत समिती व शिवाजी नगर भागातील पावसाचे पाणी वाहत येवुन लोकांच्या घरात घुसून येथील रहिवास्यांना नाहक त्रास सहन करावा लागत होता. घरात पाणी, गाळ व कचाऱ्यामुळे त्रस्त झालेल्या छत्रपती शिवाजी महाराज नगर मधील नागरिकांच्या समस्येवर उपाय म्हणून वाडा नगर पंचायतच्या माजी बांधकाम सभापती तथा माजी नगरसेविका सुचिता पाटील यांच्या प्रयत्नातून व आमदार सुनील भुसारा यांच्या निधीतून याठिकाणी गटार बांधून दिल्याने पाण्याचा निचारा होणार आहे. यासाठी वाडा नगर पंचायत हद्दीतील प्रभाग क्र.१७ मध्ये संजय वंजारी यांचे घर ते नरिग्रा यांचे घरा पर्यत रस्त्या लगत गटार बांधकामाचे शुक्रवारी (दि.३) भूमी पूजन करण्यात करण्यात आले. सदर विकास कामाच्या भूमिपूजन वेळी माजी बांधकाम सभापती तथा माजी नगरसेविका सुचीता पाटील, विक्रमगड विधानसभा युवक अध्यक्ष विराज पाटील, छत्रपती शिवाजी महाराज नगर येथील ज्येष्ठ नागरीक वसंत तांदळे, संगीता गवळी, वंदु सुतार, राकेश पाटील, मंदार तांदळे, संदिप कराळे, प्रमोद काठोळे, प्रसाद सुतार आदी. मान्यवर उपस्थित होते..

# पत्रकार संजय लांडगे यांना मशाल गौरव पुरस्कार जाहीर

**वाडा/प्रतिनिधी**



विविध क्षेत्रांमधे आदर्शवत कामगीरी करणाऱ्या नामवंत मान्यवरांना दरवर्षी मशाल या वृत्तपत्रातर्फे मशाल गौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. गेली २९ वर्ष ही परंपरा अखंडपणे सुरू आहे यावर्षीही मशाल या वृत्तपत्राच्या २९ व्या वर्धापनदिनानिमीत्त मशाल गौरव पुरस्कारांचे वितरण गुरुवारी (दि.९ नोव्हेंबर) शहापूर येथे होणाऱ्या समारंभामधे या पुरस्कारांचे वितरण मान्यवरांच्या हस्ते होणार आहे. मशाल गौरव पुरस्कारांमधे आदर्श महिला शेतकरी विद्या शरद फर्डे (धसई), आदर्श वृत्तपत्र लेखक वैभव मोहन पाटील (देवघर), आदर्श विद्यार्थिनी कु. संस्कृती सदानंद म्हात्रे (भादवड), आदर्श युवा उद्योजक शिवतेज अरुण सावंत (शहापूर), आदर्श समाजसेवक कमलाकर दूंदू पाटील (जामघर), आदर्श पत्रकार-प्रिंट मीडीया संजय श्रीपती लांडगे (वाडा), आदर्श सामाजिक कार्यकर्ते विनीत मधुकर मुकणे (जव्हार), आदर्श युवा उद्योजक सुशिल दिलीप पातकर (वाडा), आदर्श सामाजिक संस्था (सखी मंच, वाडा), आदर्श डॉक्टर डॉ. सतिष बी. जैन (वाडा), आदर्श पत्रकार-इलेक्ट्रीक मीडीया प्रितेश अश्विनभाई पटेल (कुडूस), आदर्श शिक्षक जितेंद्र पाटील (वाडा), आदर्श आरोग्य सेवक प्रभाकर दामोदर भेरे (शहापूर), आदर्श खेळाडू अरविंद वसंतराव देशमुख (दिनकरपाडा) आदर्श कलाकार दिनेश नामदेव जाधव (गौरापुर) व आदर्श साहित्यीक शैलजा शंकर कोरडे (नेरूळ) यांचा समावेश आहे. त्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव होणार आहे.

# मंगळागौर स्पर्धेत लातूरचा 'फन फार्मर्स संघ' प्रथम



**लातूर/प्रतिनिधी**

परभणी शहरातील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालय येथे घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय मंगळागौर स्पर्धेत लातूरचा फन फार्मर्स संघ प्रथम पारितोषिक पटकावला आहे. आदिशक्ती व दीपस्तंभ समुहातर्फे घेण्यात आलेल्या सन्मान 'स्त्री शक्तीचा, खेळ मंगळागौरीचा' या राज्यस्तरीय मंगळागौर स्पर्धेत लातूर जिल्ह्यातील महिलांचा फन फार्मर्स संघ' प्रथम क्रमांक पटकावत या संघाने २१ हजार रुपयाची रोख रक्कम जिंकली आहे तर या स्पर्धेचे शुभम बोराडे (मुंबई) व लखन परळीकर (मुंबई) यांनी परिक्षण केले. तर मंगळागौर या या स्पर्धेत १६ संघाने सहभाग घेतला होता तर पुणे जालना नांदेड परभणी अंबाजोगाई परतुर गंगाखेड आदी ठिकाणाहून मंगळागौरी स्पर्धेमध्ये मोठ्या उत्साहाने स्पर्धक सहभागी झाले होते. तर विजेत्या संघाला शुभम बोराडे लखन परळीकर आमदार मेघना साकोरे-बोर्डीकर लातूरच्या विजेत्या संघाला सन्मान चिन्ह व पारितोषिक देऊन सन्मानित केले तर या संघामध्ये स्नेहल आर्वीकर, मधुरा आर्वीकर, प्राजक्ता देशपांडे, चिन्मयी आर्वीकर, पूजा निगडीकर, स्वाती निगडीकर, तृप्ती जोशी, अपेक्षा आर्वीकर या महिलांच्या 'फन फार्मर्स' संघाने ही स्पर्धा जिंकून पुन्हा एकदा लातूरच्या शिरपीचा मानाचा तुरा रवला आहे. तर या स्पर्धेचे सूत्रसंचालन अंगद गरूड व प्राची यांनी केले. आदिशक्ती व दीपस्तंभ समुहाच्या सर्व सदस्यांनी स्पर्धा संपन्न होण्यासाठी उत्कृष्ट अशी प्रयत्न केले. तर मंगळागौरी या स्पर्धेतील विजय स्पर्धकांचे लातूर शहरातील नागरिकांकडून अभिनंदन केली जात आहे तसेच त्यांच्या भावी वाटचालीसाठी त्यांना शुभेच्छा देखील दिल्या जात आहेत.

# दुचाकीस्वारांचे वाढते अपघात

वसई : वसई विरार महानगरात आणि राष्ट्रीय महामार्गावर दुचाकी वाहनांचे अपघाताचे प्रकार वाढत आहेत. नालासोपारा शहरात एका दुचाकीस्वाराचा अपघातात मृत्यू झाला असून महामार्गावर देखील अशी घटना घडली आहे. यामध्ये एकाचा जागीच मृत्यू झाला आहे. विरार पूर्वेकडील महामार्गावरील शिरसाड फाट्याजवळील भामटपाडा येथे नुकतीच अपघाताची घटना घडली. येथील मौजे शिवणसई येथील वैभव शिवा आहेडा (३०) हा दुचाकीस्वार भरधाव वेगाने जात असताना गाडीवरचे त्याचे नियंत्रण सुटल्याने पुलाच्या कळड्याला आदळून गंभीर जखमी झाला होता. त्यानंतर त्याला पेल्हार येथील गॅलेक्सी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. तेथे उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. मृत वैभव यांच्या पश्चात पत्नी व मुले असा परिवार आहे. तसेच नालासोपारा येथे देखील भरधाव वेगाने दुचाकी चालवून गाडीवरील नियंत्रण सुटल्याने झालेल्या अपघातात एका तरुणाचा जागीम मृत्यू झाला.

# पाच वर्षापासून फरार दरोडेखोराला सोलापूर पोलिसांनी केले गजाआड

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

तलवारीसह शस्त्रांनी हल्ला करून दरोडा टाकून अडीच लाखांचा ऐवज लुटून पाच वर्षापासून फरार असलेल्या दरोडेखोरास सोलापूर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने जेर बंद केले. ही कारवाई करमाळा तालुक्यातील केतुर परिसरात करण्यात आली. शिवा उर्फ बापू रंजन काळे असे दरोडेखोराचे नाव आहे. पाच वर्षापूर्वी २०१८ मध्ये करमाळा तालुक्यातील वीट गावी यातील आरोपी शिवाय यांनी साथीदारांच्या मदतीने दरोडा टाकला होता. यावेळी त्याने धारदार शस्त्राने हल्ला करून सुमारे अडीच लाखांचा ऐवज लुटून नेला होता याबाबत करमाळा पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल होती. या घटनेनंतर तत्कालीन तपास अधिकारी



वाघमारे यांनी गुन्ह्यातील काही आरोपींना अटक केली होती परंतु शिवा हा तेव्हापासून फरार झाला होता तो स्वतःची ओळख पटू नये यासाठी नाव बदलून वावरत होता दरम्यान टोळीच्या वर्चस्वासाठी तसेच स्वतःच्या फायद्या करिता संघटितपणे गुन्हे करणाऱ्या या टोळीवर मोक्का कारवाई करण्यात आली होती. स्थानिक गुन्हे शाखेचे पथक शिवाच्या शोधात होते त्यावेळी त्यांना शिवा हा करमाळा येतील केतुर परिसरात येणार असल्याची खात्रीलायक माहिती मिळाली त्याला ताब्यात घेण्यासाठी पथकाने केतुर परिसरात सापळा लावला यास आपल्यात अडकल्यानंतर केलेल्या चौकशीतून तो स्वतः नाव बदलून राहत होता त्याच्या खऱ्या नावाची माहिती आता समोर आली आहे. ही सदरची कारवाई सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे , अप्पर पोलीस अधीक्षक हिम्मत जाधव, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुरेश निंबाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सुबोध जमदाडे, सहाय्यक फौजदार शिवाजी घोळवे, हवालदार प्रकाश कारटकर, रवी माने, मोहिनी भांगे, अजय वाघमारे, सुरज रामगुडे, प्रमोद माने यांनी केली आहे.

पान १ वरून....

## नात्यातल्या मुलीशी प्रेम सहन नाही ...

मालक बाळासाहेब कोष्टी यांना फोन लावला. 'दुकानात जादा काम आहे का? रोशन अजून घरी कसा आला नाही?' असे त्यांनी दुकानमालकाला विचारले. तेंव्हा दुकानमालकही आश्चर्यचकीत झाले. ते म्हणाले, 'अहो आज रोशन दुकानात आलेलाच नाही.' त्यांचे हे बोलणे ऐकून रोशनच्या घरचे लोक काळजीत पडले. त्यांनी रोशनचे मित्र, नातेवाईक, त्याच्या ओळखीचे काही लोक यांच्याकडे रोशनबद्दल चौकशी केली. पण त्यांच्याकडून काहीच माहिती मिळाली नाही. सर्वजण चिंतातूर झाले. रोशनच्या घरात त्याच्याबद्दल काळजीयुक्त चर्चा सुरू झाली. आपल्या मुलाला 'त्या' प्रकरणातून टार्गेट केलं तर नाही ना? तेंव्हा कुटुंबीयांनी त्याच्या बेपत्ताची तक्रार पोलीस ठाण्यात देण्याचे ठरवले. रोशन कुठे सापडत नाही म्हटल्यावर बुधवार दि. १८ ऑक्टोबर २०२३ रोजी रोशनच्या नातेवाईकांनी पिंपळगाव पोलीस ठाणे गाठले आणि तो बेपत्ता झाल्याची फिर्याद पोलीस ठाण्यात नोंदवली. इकडे रोशनच्या घरात रोशन बेपत्ता झाल्यामुळे घरातील वातावरण तणावपूर्ण होते. आपल्या मुलाचे बरे-वाईट झाले नसेल ना, अशी शंका झाल्टे यांना होती. कारण रोशनचे एका मुलीसोबत प्रेमसंबंध असल्याची कल्पना त्याचा भाऊ अतुल याला होती. या प्रेमसंबंधामुळे रोशनचा चुलत मामा मुकुंद घुमरे याचा मुलगा ऋषीकेश हा चिडून होता. त्याच्या जवळच्या नातेवाईक असलेल्या मुलीसोबतच रोशनचे प्रेमसंबंध असल्याने ऋषीकेश यास राग असल्याची माहिती अतुलला होती. रोशन गायब झाल्यानंतर त्याने ऋषीकेशच्या घरी जावून त्याला रोशन गायब झाल्याबाबत सांगितले. त्यावेळी ऋषीकेशचे एकूण वागणे अतुलला संशयास्पद वाटत होते. पोलीस ठाण्यात खबर देवूनही रोशनचा पत्ता लागला नव्हता. या गोष्टीला तीन दिवस उलटून गेले होते. शुक्रवार दि. २० ऑक्टोबर २०२३ चा दिवस. रोशनच्या घरच्या लोकांना पिंपळगाव पोलीस ठाण्यातून फोन आला. त्यांनी एका ठिकाणी रोशनच्या नातेवाईकांना येण्यास सांगितले. साकोरे गावाच्या शिवारात कालिया एक्सपोर्ट कोल्ड स्टोरेजमागे रमेश शंकरराव कोतवाल यांच्या शेतातील विहिरीत एक मृतदेह आढळून आला होता. त्याची खबर पिंपळगाव पोलीस ठाण्यात मिळाली होती. नुकतीच रोशन झाल्टे बेपत्ता झाल्याची खबर पिंपळगाव पोलीस ठाण्यात दाखल झाल्याने आणि त्या विहिरीतील मृतदेह बेपत्ता रोशनच्या वयाचा दिसत असल्याने पोलिसांनी त्याच्या नातेवाईकांना घटनास्थळी बोलावून घेतले होते. पोलिसांच्या निरोपानंतर घटनास्थळी रोशनचा भाऊ अतुल झाल्टे, विलास मुरलीधर झाल्टे, अमोल जनार्दन झाल्टे हे सर्वजण आले. रोशनच्या नातेवाईकांनी विहिरीत डोकावून पाहिले असता तो मृतदेह रोशनचाच आहे हे त्यांनी ओळखले. आपल्या भावाने आत्महत्या तर केली नाही ना? अशी शंका अतुलच्या मनात आली. पण मृतदेहाची एकूण परिस्थिती पाहून तो आत्महत्या करण्याची शक्यता नाही, त्याचा घातपातच झाला आहे हे अतुलला वाटू लागले. पाण्यावर तरंगणाऱ्या रोशनच्या मृतदेहाभोवती सुती दोरखंड गुंडाळलेला दिसून येत होता. दरम्यान पोलिसांनी अग्निशमन दलाला फोन लावून घटनास्थळी येण्यास सांगितले. अग्निशमन दल घटनास्थळी आल्यानंतर त्यांनी रोशनचा मृतदेह विहिरीतून बाहेर काढला. पोलिसांनी मृतदेहाची पाहणी केली असता त्याच्या कमरेस, पायास, दोरीने बांधले होते. तसेच त्याच्या मृतदेहाला दगड बांधला होता. त्याच्या डोक्यात मोठी जखमी दिसून येत होती. यावरून रोशनचा खून झाल्याचे स्पष्ट झाले. मृतदेहाचा पंचनामा झाल्यानंतर मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी पाठवण्यात आला. त्यानंतर रोशनचा भाऊ अतुल ज्ञानेश्वर झाल्टे याने पिंपळगाव पोलीस ठाण्यात रोशनचा खून झाल्याची फिर्याद दिली. गुन्हा रजिस्टर नंबर २४७ / २०२३ भा.दं. वि. ३०२, २०१, १२० (ब) हा कलमाखाली गुन्हा दाखल करण्यात आला. यावेळी अतुल झाल्टे याने दिलेल्या फिर्यादीत, रोशनचे एका मुलीसोबत प्रेमसंबंध असल्याचे समजून आले. त्याचे प्रेमसंबंध असल्याचा रागातून रोशनचा चुलत मामेभाऊ ऋषिकेश घुमरे, त्याच्यासोबत असणारा ओम अशोक डेर्ले रा. उंबडखेड, ता. निफाड यांच्याविरूद्ध अतुलने फिर्याद नोंदवली. रोशन बेपत्ता झाल्यापासून रोशनच्या चुलत मामाचा मुलगा ऋषीकेश घुमरे याचे वागणे सगळ्यांनाच संशयास्पद वाटू लागले होते, तसेच ओम डेर्ले याचा रोशनवर राग असल्याचे सर्वांना माहिती होते, म्हणूनच फिर्याद देतांना अतुल झाल्टे याने त्या दोघांवर संशय व्यक्त केला होता. त्यावरून पोलिसांनी ओम आणि ऋषिकेश यांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे केलेल्या चौकशीअंती त्यांनी आपला गुन्हा कबूल केला. ऋषीकेश आणि ओम यांनी रोशनचा खून त्याचे एका मुलीसोबत प्रेमसंबंध असल्याच्या रागातून केला. त्यांनी रोशनच्या डोक्यात फावडे मारून त्याचा खून केला आणि पुरावा नष्ट करण्यासाठी त्याच्या मृतदेहाला दगड बांधून साकोरे मिग शिवारातील विहिरीत फेकल्याचे त्यांनी सांगितले.

रोशन हा बेपत्ता झाला नव्हता, तर त्याचा या दोघांनी खून केल्याचे तपासात उघडकीस आले. नाशिक ग्रामीणचे उपविभागीय पोलीस अधिकारी सुनिल भामरे, पोलीस निरीक्षक अशोक पवार यांनी पोलीस अधीक्षक शहाजी उमाप, अप्पर पोलीस अधीक्षक माधुरी कांगणे यांच्या मार्गदर्शनाखाली हा गुन्हा उघडकीस आणला.

## दस्तगीर खाटिकचा मुलगा सुडाने ...

होती. आपल्या बापाच्या खूनाचा बदला या तरुणाने कसा घेतला याचा तपशील बघूया. भुसावळ शहराच्या महात्मा फुले नगर परिसरात दिलीप रामलाल जोनवाल हा इसम रहात होता. दिलीप जोनवाल हा भुसावळ शहरातील डॉ. विनय चौधरी यांच्या दवाखान्यात कामाला होता. सन १९९९ मधे त्यावेळी वयाच्या तिशीतील दिलीप जोनवाल याच्यासह काही साथीदारांनी गवळी वाड्यातील दस्तगीर खाटीक याचा खून केला होता. दस्तगीर खाटीक याच्या खूनाच्या आरोपाखाली दिलीप जोनवाल यास त्यावेळी सन १९९९ मधे अटक झाली होती. काही कालावधीनंतर दिलीप जोनवाल याची न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली. न्यायालयीन प्रक्रियेतून बाहेर येत निर्दोषमुक्त दिलीप जोनवाल हा आता सर्वसामान्य मनुष्याप्रमाणे जीवन व्यतीत करत होता. भुसावळ शहरातील डॉ. विनय चौधरी यांच्या दवाखान्यात तो कामाला असलेला दिलीप जोनवाल माहिती अधिकार कार्यकर्त्याचे देखील काम करत होता असे समजते.

सन १९९९ मधे खून झालेल्या दस्तगीर खाटीक याचा मुलगा आदील खाटीक हा त्यावेळी पाच वर्षाचा अजान बालक होता. आपल्या बापाचा खून करणारा दिलीप जोनवाल हा निर्दोष सुटल्याची सल आदिलच्या मनात कायम होती. बघता बघता पंचवीस वर्षाचा काळ पुढे सरकला. या कालावधीत त्याकाळचा दिलीप जोनवाल आता वयस्कर आणि आदील खाटीक हा तरुण झाला. साहजीकच या कालावधीत आदिल खाटीक याच्या अंगी तरुणपणाचा जोश होता. आपल्या बापाच्या हत्येप्रकरणी दिलीप जोनवाल यास न्यायालयाने निर्दोष मुक्त केले असले तरी तो आपल्या बापाचा मारेकरी असल्याची खंत आदिलच्या मनात कायम होती. खून का बदला खून ही भावना आदिलच्या मनात कायम होती. दिलीप यास कायमची अद्दल घडवण्याची सल आदिल यास स्वस्थ बसू देत नव्हती. अखेर तो दिवस जवळ आला आणि दिलीप जोनवाल याची हत्या आदील आणि त्याच्या चुलत्याकडून झाली. २४ ऑक्टोबर २०२३ या दिवशी दसरा सणाची सर्वत्र धामधुम होती. या रात्री सुमारे नऊ वाजेच्या सुमारास दिलीप जोनवाल हा दवाखान्याचे कामकाज आटोपून घरी आला. घरी आल्यानंतर तो नजीकच्या अकलूद या गावी एका हॉटेलवर जेवण करण्यास गेला. त्याच हॉटेलमधे दुसऱ्या टेबलवर आदिल खाटीक आणि त्याचा चुलता साजीद सगिर खाटीक असे दोघे जेवण करण्यास बसले होते. एका टेबलवर बसलेला दिलीप जोनवाल आणि दुस-या टेबलवर चुलत्यासोबत बसलेला आदिल खाटीक या दोघांची नजरानजर झाली. आपल्या बापाचा मारेकरी दिलीप जोनवाल दिसताच आदिलचा राग उफाळून आला. एका बाजूने आदिल खाटीक, त्याचा चुलता साजीद खाटीक आणि दुस-या बाजूने दिलीप जोनवाल अशा तिघांमधे शाब्दिक वाद सुरु झाला. हा वाद काही केल्या शमण्याची चिन्हे दिसत नव्हती. त्यावेळी रात्रीचे बारा वाजले होते. त्यावेळी दिलीप जोनवाल यास त्यांचा मुलगा संग्राम जोनवाल याचा फोन आला. मी पंधरा ते विस मिनीटात घरी येतो असे दिलीप जोनवाल याने मुलगा संग्राम यास मोबाईलवर सांगीतले. कसाबसा वाद मिटवत दिलीप जोनवाल याने आपल्या घराकडे जाण्याचा निर्णय घेतला. दरम्यान आदिल आणि साजीद या दोघांनी रिक्षाने त्याचा पाठलाग सुरु केला. साजीद हा भंगार व्यावसायीक असल्याने त्याच्या ताब्यातील रिक्षात एक लोखंडी पाईप होता. दोघे जण मालवाहू रिक्षाने दिलीप जोनवाल याचा पाठलाग करत होते. भुसावळ शहरातील गरुड प्लॉट भागातील क्रांती चौकात आदील आणी साजीद या दोघांनी दिलीप जोनवाल यास अडवले. याठिकाणी पुन्हा दोघांनी त्याच्यासोबत वाद घातला. दरम्यान दिलीप जोनवाल याचा प्रवासी रिक्षा चालक असलेला भाऊ सुनिल रामलाल जोनवाल हा रिक्षा घेऊन घरी जात होता. वाटेत क्रांती चौकात जोरजोरात वाद होत असल्याचे बघून तो त्या ठिकाणी आला. त्यावेळी त्याला आदिल खाटीक आणि साजीद खाटीक हे दोघे पळून जातांना दिसले. पळून जाणाऱ्या साजीदच्या हातात लोखंडी पाईप असल्याचे सुनिल जोनवाल याने पाहिले. रक्ताच्या थारोळ्यात कवटी फुटून पडलेला इसम कोण आहे हे पाहण्यासाठी सुनिल जोनवाल रिक्षातून बाहेर आला. त्यावेळी मरण पावलेला इसम हा दुसरा तिसरा कुणी नसून आपला भाऊ दिलीप जोनवाल असल्याचे सुनिल याच्या लक्षात आले.

आपला भाऊ रक्ताच्या थारोळ्यात पडून असल्याचे बघताच सुनिल याने पुतण्या संग्राम जोनवाल यास फोन करुन घटनास्थळी बोलावले. तुझे वडील गरुड प्लॉट भागात मरण पावले असून तु लवकर निघून ये असे सुनिल जोनवाल याने पुतण्या संग्राम यास सांगितले. या घटनेची माहिती मिळताच संग्राम जोनवाल हा घटनास्थळी दाखल झाला. दरम्यान या घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी भुसावळ शहर पोलिस स्टेशनचे पो.नि. गजानन पडघन व त्यांचे सहकारी हजर झाले. कायदेशीर कारवाई केल्यानंतर मृतदेह उत्तरीय तपासणीकामी दवाखान्यात रवाना करण्यात आला. या घटनेच्या वेळी प्रत्यक्षदर्शी साक्षीदार सुनिल जोनवाल याने आदिल खाटीक आणि साजीद खाटीक या दोघांना पळून जातांना पाहिले होते. त्यामुळे मयत दिलीप जोनवाल याचा मुलगा संग्राम जोनवाल याने दिलेल्या फिर्यादीनुसार आदिल खाटीक आणि साजीद खाटीक या दोघांविरुद्ध खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. क्रमाक्रमाने दोघा हल्लेखोर संशयीतांना अटक करण्यात आली. उप विभागीय पोलिस अधिकारी कृष्णात पिंगळे या गुन्ह्याचा पुढील तपास करत असून पो.नि. गजानन पडघन व त्यांचे सहकारी त्यांना सहकार्य करत आहेत.

## पती पत्नीच्या भांडणात आई मधे...

कारणावरून शिवीगाळ आणि मारहाण करत होता. आल्यावर जेवणातील भाजीच्या कारणावरून पत्नी रजनी यांच्यासोबत वाद घातला. या वादात त्याने रजनी यांना मारहाण केली. इतकेच नव्हे, तर घरातील लोखंडी सळाख हातात घेऊन तुला आज मारूनच टाकतो, असे म्हणत तो त्यांच्या अंगावर धावून गेला. त्यामुळे त्याची आई सीताकौर ह्या भांडणात मध्यस्थी करायला गेल्या. त्यावर नरसिंगने आई सीताकौर यांच्या छातीत लोखंडी सळाख भोसकून त्यांची हत्या केली. ही बाब शेजारी राहणाऱ्या नागरिकांच्या लक्षात आल्यावर सीताकौर यांना रक्तबंबाळ अवस्थेत उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी रजनी यांनी मोर्शी ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीवरून पोलिसांनी आरोपी नरसिंगविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करून त्याला अटक केली. पुढील तपास ठाणेदार श्रीराम लांबाडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक स्वप्निल रणखांब करीत आहेत.

पान ८ वरून....

## इन्स्टाग्राम रिल्स बनवणाऱ्या दोन ...

आहे. शिस्तभंग केल्याप्रकरणी त्यांची चौकशी करण्यात येत असल्याचे अधिकाऱ्याने स्पष्ट केले. याशिवाय वसई रेल्वे पोलीस ठाण्यात दोन पोलिसांवर कोचिंक सेंटर चालवल्याप्रकरणी निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. सेवा नियमाचे उल्लंघन केल्याप्रकरणी या दोन्ही पोलिसांवर निलंबनाची कारवाई करण्यात आल्याचे वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले. त्यात एका पोलीस अधिकाऱ्याचा समावेश आहे. याबाबत योग्य संदेश देणे आवश्यक असल्यामुळे वरिष्ठांनी ही कारवाई केली.

## वसई-विरार महापालिका कर्मचाऱ्यांना...

निर्देश आयुक्तांनी दिलेले आहेत. दिव्यांग-अंपगांना पालिकेपर्यंत हेलपाटे मारावे लागू नयेत, याकरता एका सॉफ्टवेअरची निर्मिती करण्यात आली आहे. ऑनलाईन पद्धतीने अर्ज केल्यानंतर दिव्यांग-अंपगांना त्यांना मिळणाऱ्या सोयी-सुविधांतील अडचणी दूर होणार आहेत. तूर्त हे सॉफ्टवेअरची चाचणी सुरू असल्याची माहिती आयुक्तांनी दिली आहे. विशेष म्हणजे महिला बचत गटांनाही त्यांचे संपूर्ण मानधन अदा करण्यात आलेले आहे. यासोबतच वसई-विरार महापालिका क्षेत्रात ज्या ठेकेदारांची कामे पूर्ण झालेली आहेत, अशा ठेकेदारांना त्यांच्या कर्मचाऱ्यांना बोनस देता यावा याकरता त्यांची बिले अदा केलेली आहेत. आतापर्यंत यातील ९० टक्के इतके पेमेंट झालेले आहे. उर्वरितही येत्या दोन दिवसांत होईल. यात एकही जण वंचित राहणार नाही, असा विश्वास आयुक्त अनिलकुमार पवार यांनी व्यक्त केला आहे.

## एमएमआरडी आयुक्तांकडे वसई-विरारला...

होत असतो. नव्या योजनेतून विरारला १८५ एमएलडी पाणी पुरवठा होणार आहे. याबाबत राज्य शासनाचे उदासिन धोरण तसेच पालिकेचा प्रशासकीय कारभार यामुळे गैरसोयींना तोंड द्यावे लागत आहे. आयुक्त मुखर्जी यांनी निवदेन स्वीकारले असून पाणी पुरवठ्याचे आश्वासन दिले.

06 TO 12 NOVEMBER 2023 - Page 7 (CRIME SANDHYA):Layout 1 11/4/2023 10:10 PM Page 1



# जिल्हा परिषद युनियनच्या वतीने कंत्राटी स्वच्छता कर्मचारी, सुरक्षा रक्षकांना दिवाळी साहित्य आणि सुगंधी वस्तूंचे वाटप




**सोलापूर/प्रतिनिधी**

सोलापूर जिल्हा परिषद कर्मचारी युनियनच्या वतीने सालाबादप्रमाणे दिवाळी निमित जिल्हा परिषद मुख्यालय, पंचायत समिती दक्षिण सोलापूर, उत्तर सोलापूर, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, यशवंत नगर, विकास गंगा निवासस्थान या ठिकाणी कार्यरत खाजगी कंत्राटी सुरक्षा रक्षक व स्वच्छता करणारे सर्व कर्मचारी अशा ४० लोकांना दिवाळीचे साहित्य व सुगंधी वस्तूचे वाटप ज्यामध्ये २५ किराणा व सुगंधी वस्तूंचा समावेश आहे अशा किटचे वाटप सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा आव्हळे यांच्या शुभहस्ते व मीनाक्षी वाकडे मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्या उपस्थितीत करण्यात आले. याप्रसंगी मुख्य कार्यकारी अधिकारी आव्हाळे यांनी उपस्थित सर्व कर्मचाऱ्यांना शुभेच्छा दिल्या. जिल्हा परिषद कर्मचारी युनियन प्रत्येक वर्षी दिपावली फराळ साहित्य वाटपाचा कार्यक्रम आयोजित करते हा फारच स्तुत्य उपक्रम आहे. यानिमित्ताने जिल्हा परिषद कर्मचारी युनियन फक्त जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांचे प्रश्न व अडचणी मांडते असे नाही तर सफाई कामगार व सिक्युरिटी कर्मचारी यांचेशी संवेदनशील व आपुलकीने दिवाळी आनंदात साजरी करण्याचे भावना आमचे कर्मचारी ठेवतात हे निश्चित कौतुकास्पद आहे अशी भावना व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राज्य सरचिटणीस विवेक लिंगराज, सूत्र संचालन डॉ.एस पी. माने, आभार अध्यक्ष तजमुल मुतवली यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी महिला अध्यक्ष अनुपमा पडवळे, आरती माढेकर, सनाबेगम कर्जगी, सविता काळे, सविता मिसाळ, लक्ष्मी शिंदे, राजेश्री कांग्रे, वर्षा औदूर्ती, श्रीशैल देशमुख, त्रिमूर्ती राऊत, विलास मसलकर, राकेश सोडी, रोहित घुले, संतोष शिंदे, रवी करजगी, अभिमन्यू कांबळे, राजीव गाडेकर, शेखर जाधव, रेवणसिद्ध म्हेत्रे आदींनी परिश्रम घेतले.

# भिवंडीत यंत्रमाग बंद विरोधात कामगार संघटना आक्रमक, लालबावटा कामगार संघटनेचे निवेदन

**भिवंडी/प्रतिनिधी**



शहरातील यंत्रमाग मालकांनी आपल्या कामगारांना कोणतीही पूर्वसूचना न देता आणि त्याच्या उपजीविकेची कोणतीही तजवीज न करता अचानकपणे आपापले यंत्रमाग वीस दिवस बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. यंत्रमाग कामगारांना गृहीत धरून घेतलेल्या या निर्णया विरोधात सिटू संलग्न लालबावटा पॉवरलूम वारपर व असंघटित कामगार संघटनेच्या वतीने बुधवारी प्रांत कार्यालयात निवेदन देऊन आपला संताप व्यक्त केला आहे. लालबावटा पॉवरलूम वारपर व असंघटित कामगार संघटनेच्या वतीने मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते परंतु सध्या संपूर्ण राज्यातील ढासळलेली कायदा व सुव्यवस्था व गढूळ झालेल्या वातावरणा मुळे मोर्चा रद्द करून कामगारांच्या मागणीचे निवेदन प्रांत कार्यालयात देण्यात आले असे कोम्रेड सुनील चव्हाण यांनी दिली. भिवंडीत सुमारे सात लाखां पेक्षा जास्त पावरलूम असून ऐन दिवाळीच्या काळात यंत्रमाग मालकांनी बंद ठेवण्याचा निर्णय घेतल्याने कामगारां मध्ये संताप व्यक्त केला जात आहे. यंत्रमाग मालकांनी घेतलेल्या या निर्णयाच्या विरोधात पॉवरलूम वारपर व असंघटित कामगार संघटना लालबावटा युनियनचे अध्यक्ष कॉ.सुनील चव्हाण यांनी कठोर भूमिका घेत शासनाकडे कामगाराची भूमिका मांडण्यासाठी भिवंडी प्रांत कार्यालयामध्ये निवेदन दिले. हे निवेदन प्रांतांच्या गैरहजेरीत नायब तहसीलदार चंद्रकांत राजपूत यांनी स्वीकारले. यंत्रमाग कारखाने बंद करण्या पूर्वी मालकांनी सर्व कामगारांना एक महिन्याचा पगार भरून दिला पाहिजे.कामगारांना गावी जाण्यासाठी अतिरिक्त गाड्यांची सोय झाली पाहिजे, गावी जाणार नसलेल्या कामगारांच्या खाण्यापिण्याची व्यवस्था मालकांनी केली पाहिजे.कामगार कायद्यानुसार कामगारांना सुविधा न देणाऱ्या यंत्रमाग कारखाना मालकांना मिळणाऱ्या सरकारी सवलती आणि वीजदरात सवलत बंद करावी. शासकीय नियमानुसार यंत्रमाग कारखाना बाहेर नोंदणीकृत आस्थापनाचे दर्शनी भागात फलक लावून त्यामध्ये कारखाना मालकांचे नाव, कामगारांची संख्या आणि आस्थापनाचा संपूर्ण पत्ता नमूद करावा. यंत्रमाग मालकांना कारखान्यातील कामगारांना कामगार कायद्यानुसार सोयी, सुविधा आणि सवलती देण्यास भाग पाडा, आशा कामगारांच्या मागणीचे निवेदन प्रांत कार्यालयात लालबावटा संघटनेचे स्थानिक अध्यक्ष कॉ. सुनील चव्हाण यांनी दिले आहे.या मागण्यासाठी यंत्रमाग मालकांच्या संघटनांशी चर्चा करून या मागण्या पूर्ण केल्यास मालकां च्या यंत्रमाग बंद आंदोलनास कामगारांचा पाठिंबा राहील अन्यथा कामगारांचे आंदोलन तीव्र करण्यात येईल असा इशारा कोम्रेड सुनील चव्हाण यांनी दिली आहे..

# क्रांतीगुरु लहुजी वस्ताद साळवे यांच्या जयंतीचे उदगीर अध्यक्षपदी बन्सीलाल दादा उदयगिरी, सचिवपदी पप्पू गायकवाड यांची निवड



**देवणी/प्रतिनिधी**

उदगीर येथील शासकीय विश्रामगृह येथे क्रांतिगुरू लहुजी वस्ताद साळवे यांच्या २२९ व्या जयंती निमित्त बैठकिचे आयोजन बाबुरावआंबेगावे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली व पदाधिकाऱ्याची निवड करण्यात आली. कार्यकारिणी खलील प्रमाणे अध्यक्षपदी बन्सीलाल दादा उदयगिरी, उपाध्यक्ष शेषेराव करखेलीकर, अजित कांबळे, तातेराव शिंदे, मारुती गायकवाड, कार्याध्यक्ष रवींद्र बेद्रे, सचिव पप्पू यादवराव गायकवाड, कोषाध्यक्ष दीपक गायकवाड, संघटक रणजित शेळहळकर, सहसचिव तानाजी भोसले अविनाश मोरे माळेवाडीकर सहसंघटक, कमलाकर गायकवाड मिरवणूक प्रमुख जवाहरलाल बन्सीलाल कांबळे, संयोजक संग्राम अंधारे, निमंत्रक राजू मोहन सूर्यवंशी, प्रसिद्धी प्रमुख रवि गोविंद गायकवाड, महिला आघाडी प्रमुख रेणुकाताई उपांडे, सहनिमंत्रक विनोद कांबळे, सहसंघटक प्रशांत शिंदे, सल्लागार विष्णूजी लांडगे, बाबुराव आंबेगावे, मनोहर गायकवाड, जॅकी दादा सावंत आदिंची निवड करण्यात आली असल्याचे प्रसिध्दी पत्रकान्वये कळविले आहे.


# मालोडी टोलनाका फोडणाऱ्या तिघांवर गुन्हा



**भिवंडी/प्रतिनिधी**

मालोडी टोलनाक्याची बुधवारी (ता. १) तोडफोड करण्यात आली होती. या प्रकरणी गुरुवारी तिघांवर तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महेंद्र पाटील, प्रशांत म्हात्रे आणि व्हिडीओ चित्रीकरण करणाऱ्या त्यांच्या अन्य एका साथीदारावर हा गुन्हा दाखल झाला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, खारबावचे माजी सरपंच महेंद्र पाटील आणि पाये गावचे उपसरपंच प्रशांत म्हात्रे यांच्यासह त्यांच्या अन्य एका साथीदाराने अंजूर - फाटा चिंचोटी रस्त्याची दुरवस्था झाल्याचे सांगून ठेकेदार सुप्रीम इन्फ्रास्ट्रक्चर कंपनी आणि संबंधित प्रशासनाविरोधात संताप व्यक्त करत टोलनाक्याची तोडफोड केली. याचे चित्रीकरण माध्यमांवर व्हायरल केले. या तोडफोडीच्या घटनेनंतर तिघेही आरोपी फरार झाले असून पोलिस त्यांचा शोध घेत आहेत.

# देवणी येथील नुतन तहसीलदार गजानन शिंदे यांचा सत्कार



**देवणी/प्रतिनिधी**

देवणी तहसीलदार पद बऱ्याच महिण्यापासुन रिक्त होते. गजानन शिंदे हे देवणी तहसील कार्यालय येथे रूजू झाल्याबद्दल दि.३० ऑक्टोबर रोजी देवणी येथील तहसील कार्यालयात उपेक्षित लोककलावंत मजूर निराधाराची पुनर्वसन संघटना, व श्रमिक क्रांती अभियान या सामाजिक संघटनेच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी वसंत बीबीनवरे, विलास वाघमारे, रवींद्र बनसोडे, गोकुळ दंतराव, सौ.किरण गोकुळ दंतराव, रोहित डोंगरे, तहसील कार्यालय मंडळ अधिकारी अनिता ढगे, बालाजी केंद्रे,पेशकार माधव साळुंके, दृष्टांत कांबळे, तलाठी लक्ष्मण कांबळे, गोपाळ बिरादार, अजय अलापुरे, पुरी सर,डी.जि पवार, अबरार शेख, व्यंकटेश बीजपुरे, सुग्रीव बिरादार, तुकाराम रामसने, रफी शेख, पंडित कांबळे व तसेच पत्रकार बांधव लक्ष्मण रणदिवे, भैय्यासाहेब देवणीकर, जयेश ढगे आदींची उपस्थिती होती.

# धनेगांवच्या उपसंरपंचपदी रामलिंग शेरे यांची बिनविरोध निवड

**देवणी/प्रतिनिधी**



धनेगांव ता देवणी येथील उपसरंपंचपदी भाजयुमोचे तालुकाध्यक्ष रामलिंग शेरे यांची बिनविरोध उप-संरपंचपदी निवड करण्यात आली. यावेळी निवडणुक निर्णय अधिकारी म्हणुन देवणी पंचायत समितीचे सहाय्यक गटविकास अधिकारी कांबळे, विस्तार अधिकारी अशोक कट्टेवार, ग्रामसेवक श्रीकांत पताळे हे होते. यावेळी संरपंच सौ मिनाताई परीट, माजी उपसरंपंच रविद्रकुमार पाटील, विठ्ठल बोयणे, लक्ष्मण पवार, विजयकुमार गायकवाड, निर्मलाबाई कुलकर्णी, सौनाली भंडे, लक्ष्मी बिरादार, मादाबाई तुरे, शेषाबाई चव्हाण इत्यादी ग्रामपंचायत सदस्य, चेअरमन संगाप्पा चरपले, नरसिंग बिरादार, जंयत पाटील, व्हाईस चेअरमन अमर बिरादार, सुभाषअण्णा शेटकार शंकर बिरादार, बाळासाहेब बिरादार, प्रंशात पाटील दवणहीप्पर्गेकर,सुधिर भोसले, ज्योतीराम बिरादार, किशोर बिरादार, किशोर कारभारी, चंद्रकात बिरादार, दिपक पवार, शेटीबा पवार, शंकर आपटे, बाबु पाटील, बाळासाहेब बिरादार, दंयानंद बिरादार अदी उपस्थित होते.

# किडनी उपलब्ध करून देण्याच्या नावाखाली आर्थिक फसवणूक!

**अंबरनाथ/प्रतिनिधी**



किडनीच्या आजाराने त्रस्त असलेल्या अंबरनाथ पश्चिमेतील एक २३ वर्षीय तरुणी आणि तिच्या कुटुंबीयांची एका व्यक्तीने प्रत्यारोपणासाठी तत्काळ किडनी उपलब्ध करून देण्याच्या नावाखाली दोन लाख ९८ हजार रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे. अमय प्रेमचंद उपाध्याय असे या आरोपीचे नाव असून या प्रकरणी अंबरनाथ पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अंबरनाथ पश्चिमेतील बुवापाडा येथील एक तरुणी किडनीच्या विकाराने ग्रस्त आहे. तिच्यावर मुंबईच्या केईएम रुग्णालयात उपचार सुरू होते. केईएम रुग्णालयातच या तरुणीसोबत अंबरनाथ पश्चिमेतील सृष्टी हिल परिसरात राहणार अमय प्रेमचंद उपाध्याय याचा परिचय झाला. या तरुणीसाठी कुटुंबीयांची किडनी प्रत्यारोपणासाठी धावपळ सुरू असल्याचे त्याच्या लक्षात आले. त्याने प्रत्यारोपणासाठी किडनी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले. त्यानंतर त्याने एप्रिल ते मे या दरम्यान दोन लाख ९८ हजार रुपये वेळोवेळी ऑनलाइनच्या माध्यमातून उकळले, मात्र बराच काळ लोटूनही अमय किडनी उपलब्ध करून देत नव्हता. दिलेल्या पैशांची मागणी केली असता, पैसेही परत करत नव्हता. आपली आर्थिक फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यावर त्यांनी अंबरनाथ पोलिस स्टेशनमध्ये धाव घेतली. आरोपी उपाध्याय याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीचा पोलिस शोध घेत असून त्याने या प्रकारे आणखी काही नागरिकांची फसवणूक केली आहे का, याचाही पोलिस तपास करत असल्याची माहिती अंबरनाथ पोलिस स्टेशनचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक जगन्नाथ कळसकर यांनी दिली.

# नायगाव येथे १५ वर्षीय मुलीची गच्चीवरून उडी मारून आत्महत्या



**वसई/प्रतिनिधी**

नायगावमध्ये इमारतीच्या गच्चीवरून उडी मारून पंधरा वर्षाच्या मुलीने आत्महत्या केली आहे. सृष्टी ठाकूर असे या मुलीचे नाव आहे. सोमवारी दुपारी ही घटना घडली. याप्रकरणी नायगाव पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. सृष्टी ठाकूर ही १५ वर्षीय मुलगी नायगाव पूर्वेच्या वाकीपाडा येथील कृष्णा अपार्टमेंट या इमारतीत राहत होती. सोमवारी दुपारी सव्वा तीन च्या सुमारास सृष्टी शेजारील इमारती वरील गच्चीवर गेली. अचानक तिने इमारतीच्या गच्चीवरून उडी मारली. जखमी अवस्थेत तिला जवळच्या खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र डॉक्टरांनी तिला मयत घोषित केले. याप्रकरणी नायगाव पोलीस ठाण्यामध्ये अपमृत्यूचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी तिच्या भावाने पोलिसात फिर्याद दिली आहे. आत्महत्या पूर्वी पुणे कुठल्याही प्रकारची चिठ्ठी लिहिलेली नव्हती. तिने आत्महत्या का केली याचा पोलीस तपास करत आहे.

# आधी कमिशन, नंतर लाखोंचा झोल; टास्कच्या नादात ठाण्यातील तरुणाचं अकांउंट झालं साफ

**ठाणे/प्रतिनिधी**



एअर तिकीट बुकिंगचा टास्क पूर्ण केल्यानंतर सुरुवातीला चांगले कमिशन दिले, नंतर मात्र सायबर गुन्हेगारांनी फसवणुकीच्या जाळ्यात ओढत डोंबिवलीतील एका व्यक्तीकडून ऑनलाइनद्वारे तब्बल ३४ लाख ३२ हजार रुपये उकळल्याचा प्रकार समोर आला आहे. आरोपींविरुद्ध मानपाडा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. डोंबिवलीमध्ये वास्तव्यास असलेले अमित (नाव बदलले आहे) अंबरनाथमधील फार्मा कंपनीत नोकरी करतात. मागील महिन्यात टेलिग्राम ॲपवरून नोकरी शोधताना त्यांना एका व्यक्तीचा नोकरीबाबत मेसेज आला. या व्यक्तीने त्याची एअर तिकीट बुकिंग कंपनी असून कंपनीच्या संकेतस्थळावरून ऑनलाइन तिकीट बुकिंगचे काम असल्याचे अमित यांना सांगितले. त्याने एक लिंकही पाठवली. ही लिंक उघडून अमित यांनी लिंक वर नोंदणी केली. तसेच, या संकेतस्थळावरच एअर तिकीट बुकिंग करण्याचा टास्क पूर्ण केल्यानंतर कमिशन देण्याचे या व्यक्तीने आमिष दाखवल्याने ते हे काम करण्यास तयार झाले. टास्क पूर्ण करण्यासाठी सुरुवातीला ऑनलाइन १० हजार रुपये पाठवत त्यांनी पहिला टास्क पूर्ण केला. या कामाचे त्यांना १७ हजार ६६४ रुपये मिळाले. नंतर सायबर गुन्हेगारांनी दुसरा टास्क पूर्ण करण्यासाठी अमित यांच्याकडून ३६ हजार रुपये घेतले. हा टास्क पूर्ण केल्याबद्दल त्यांना ४८ हजार ७७३ रुपये मिळाले. चांगले पैसे मिळत असल्याने या कामावर अमित यांचा विश्वास बसला. सायबर गुन्हेगार अमित यांना वेगवेगळे टास्क देत त्यांना बँक खात्यावर पैसे पाठवण्यास सांगत होते. त्यानुसार त्यांनी एकूण ३४ लाख ३२ हजार रुपये बँक खात्यांमध्ये पाठवले. तसेच, त्यांनी एअर तिकीट बुकिंगचे टास्कही पूर्ण केले. परंतु, या कामाचे कमिशन न मिळाल्याने त्यांनी विचारणा केल्यानंतर आरोपी उडवाउडवीची उत्तरे देऊ लागले. फसवणूक झाल्याचे कळताच अमित यांनी मानपाडा पोलिस ठाण्यात धाव घेत तक्रार केली.

# डॉ.विमल सूर्यवंशी यांना भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल राष्ट्ररत्न पुरस्काराने सन्मानित



**देवणी/प्रतिनिधी**

पुणे येथे मणिभाई मानव सेवा ट्रस्टच्या वतीने डॉ विमल सुर्यवंशी यांच्या चांगल्या पद्धतीने सामाजिक, साहित्यिक शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे तसेच शाळेतील विद्यार्थीना चांगले व दर्जेदार शिक्षण शिकवण्याचे काम, साहित्यिक अनेक पुस्तके व चांगल्या प्रकारे लेख, लिहण्याचे काम केल्यामुळे, डॉ रविंद्र भोळे अध्यक्ष यांच्या संस्थाचा माध्यमातून भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल राष्ट्ररत्न २०२३ चा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले, हा पुरस्कार मिळाल्याबद्दल श्रमिक क्रांती अभियानाचे संस्थापक अध्यक्ष मारोती गुंडिले, मराठवाडा प्रमुख डि,एन कांबळे, जिल्हाध्यक्ष गजानन गायकवाड अजणीकर, हुसेन धोत्रे, देवानंद सावंत, पत्रकार लक्ष्मण रणदिवे, जयेश ढगे, भैय्यासाहेब देवणीकर, आदींनी अभिनंदन केले आहे.

# माजी आमदार पांडुरंग बरोरा यांचा अनेक कार्यकर्त्यासोबत राष्ट्रवादी कॉंग्रेसमध्ये प्रवेश

**वाडा/प्रतिनिधी**

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष, खासादर शरद पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत शहापूर विधानसभेचे माजी आमदार पांडुरंग बरोरा व त्यांचे वाडा तालुक्यातील सहकारी तालुक्यातील पांडुरंग पठारे, हरिश्चंद्र पाटील, रविंद्र पाटील, दिलीप पाटील, चेतन काठोले, राकेश पाटील, संभाजी पाटील, राहुल वेखंडे, रोहिदास घोरकणे, अर्जुन खरपडे, अशोक शेंडे, जगन्नाथ मेंगाळ, विठ्ठल पाटील यांनीही पक्ष प्रवेश केला. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या कार्याध्यक्षा संसदरत्न खासदार सुप्रिया सुळे, प्रदेशाध्यक्ष, आमदार जयंत पाटील, राष्ट्रीय सरचिटणीस, आमदार जितेंद्र आव्हाड, आमदार सुनील भुसारा, माजी आमदार मिलिंद अण्णा कांबळे, माजी आमदार मुख्य प्रवक्त्या विद्या चव्हाण, राष्ट्रीय प्रवक्ते तथा राष्ट्रीय चिटणीस नसीम सिद्दीकी, प्रदेश सरचिटणीस रविंद्र पवार, प्रदेश सरचिटणीस बसवराज पाटील, प्रदेश सरचिटणीस प्रशांत पाटील, युवक प्रदेशाध्यक्ष महेबुब शेख, ठाणे ग्रामीण जिल्हाध्यक्ष काशिनाथ पाटील, ठाणे ग्रामीण महिला जिल्हाध्यक्ष विद्या वेखंडे, ठाणे ग्रामीण उपाध्यक्ष अविनाश देशमुख, अविराज देशमुख, अविनाश थोरात, अंनता शेलार, निलेश पाटोळे, खंडू बरोरा तसेच ठाणे ग्रामीण जिल्हा व शहापूर मतदार संघातील सर्व पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.




## कै.शांता वैजनाथअप्पा मुळे यांचे निधन



लातूर : लातूर येथील मजगे नगर भागातील कै. शांता वैजनाथअप्पा मुळे यांचे दिनांक ०२/११/२०२३ रोजी ७.३० वाजता त्यांचे दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली असा भरगच्च परिवार असून आज त्यांचे सिद्धेश्वर स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. दैनिक प्रतिव्यवहारचे संपादक प्रभुअप्पा मुनाळे यांच्या त्या मोठ्या बहीणबाई होतं.

06 TO 12 NOVEMBER 2023 - Page 8 (CRIME SANDHYA):Layout 1 11/4/2023 10:11 PM Page 1



# मराठा प्रश्नावर सर्व पक्ष बैठकीसाठी एकत्र येतात समाजवादी पक्षाला टाळतात त्यांना भीती आहे आम्ही मुस्लिम आरक्षणाचा मुद्दा काढू -अबू आसिम आजमी



भिवंडी/प्रतिनिधी

सकल मराठा आंदोलन करणाऱ्यांनी आपली ताकद दाखवली त्यामुळे सरकार त्यांच्या पायाशी गेले. मराठा आरक्षण प्रश्नावर सर्व पक्षीय सभा झाली ज्यांचे एक ही आमदार नाही त्यांना आमंत्रण दिले फक्त समाजवादी पक्षाला डावललं.आम्ही मुस्लिम आरक्षणाचा मुद्दा मांडू याची भीती सर्व राजकीय पक्षांना वाटली होती असा आरोप समाजवादी पार्टीचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष अबू आसिम आजमी यांनी केला आहे.ते भिवंडी शहरातील शांतीनगर के जी एन चौक येथे समाजवादी पक्षाचे भिवंडी पूर्व विधानसभा मतदार संघाचे आमदार रईस शेख यांच्या कार्यकाळास चार वर्ष पूर्ण झाल्याने भिवंडीत समाजवादी पक्षाच्या परिवर्तन रॅलीचे आयोजन शुक्रवारी रात्री शांतीनगर के जी एन चौक याठिकाणी करण्यात आले होते.याप्रसंगी आमदार रईस शेख,प्रदेश उपाध्यक्ष अजय यादव,आझाद प्रतापगढी यांसह मोठ्या संख्येने पक्ष पदाधिकारी उपस्थित होते.

सरकार मराठा आंदोलकांना रात्री उशिरा पर्यंत आंदोलन करायला परवानगी देते.आम्ही मुस्लिम आरक्षणा साठी सहा नोव्हेंबर रोजी मुंबईत सायकल मोर्चा काढणार आहोत त्याला पोलिस आडकाठी करतात.पण आम्ही आंदोलना वर ठाम असून हिम्मत असेल तर पोलिसांनी अडवून दाखवावे असा इशारा देत मुस्लिम आपली मक्तेदारी असल्याचा दावा करणारे काँग्रेस राष्ट्रवादी काँग्रेस यांनी सुध्दा मुस्लिम आरक्षणासाठी काही ही केले नाही असा आरोप अबू आसिम आजमी यांनी केला. काश्मीर फाईल्स हा चित्रपट बोगस असून माहिती अधिकारात काश्मीर मध्ये मागील तीस वर्षात हत्या झालेल्यांची संख्या १७३० आहे.त्यापैकी फक्त ७९ काश्मिरी पंडित होते. तरी सरकार फक्त काश्मिरी पंडितांसाठी रडत बसली आहे. हिंदू मुस्लिम या एकते मध्ये फूट टाकण्याचे काम नरेंद्र मोदी हे करीत आहेत. पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया देशात अराजकता मजवणारे या देशाला इस्लामिक राष्ट्र करण्याची भाषा करीत होते म्हणून त्यांच्यावर बंदी घातली हा देश सेक्युलर आहे. हा देश हिंदू मुस्लिम यांचा आहे. पण या देशाला हिंदू राष्ट्र बनवणार अशा गर्जना करणाऱ्या भाजपा आरएसएस वर कोणतीही बंदी नाही असा आक्षेप अबू आसिम आजमी यांनी नोंदवला.कार्यक्रमाच्या प्रारंभी आमदार रईस शेख यांच्या चार वर्षांच्या कार्य अहवालाचा प्रकाशन सोहळा अबू आसिम आजमी यांच्या शुभहस्ते करण्यात आला. तर कार्यक्रमस्थळी येताना शहरातून भव्य स्वागत रॅलीचे आयोजन करून ठिकठिकाणी जोरदार स्वागत करण्यात आले. तर सभेस मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

# आदर्श संसार करा -खमीतकर



सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी

आदर्श संसार करा जिल्हा समाज कल्याण अधिकारी सुनील खमितकर यांचे प्रतिपादन सोलापूर २ नोव्हेंबर समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद सोलापूर विभागाच्या वतीने आंतरजातीय विवाह केलेल्या दांपत्यांचा शिवरत्न सभागृह जिल्हा परिषद सोलापूर येथे माननीय मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे यांच्या मार्गदर्शनानुसार जिल्हा समाज कल्याण अधिकारी सुनील खमितकर यांच्या हस्ते एकूण २५ जोडप्याचा सत्कार करण्यात आला. या दांपत्यांना आंतरजातीय विवाह प्रोत्साहन पर आर्थिक सहाय्य योजनेतून प्रतिकुटुंब पन्नास हजार रुपयाचे अनुदानाचे वाटप करून सन्मानित करण्यात आले सदर प्रसंगी उपस्थित दोन दाम्पत्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. सत्कार प्रसंगी मार्गदर्शन करताना सुनील खमितकर म्हणाले की आंतरजातीय विवाहकरून समाजापुढे एक आदर्श निर्माण केला आहे.

आंतरजातीय विवाह ही काळाची गरज बनली आहे तसेच आंतरजातीय विवाह टिकवणे हेसुद्धा गरजेचे आहे समाजामध्ये मोठ्या प्रमाणात झालेल्या शिक्षणाच्या प्रसारामुळे आंतरजातीय विवाहाचे प्रमाण वाढले आहे. तसेच कुटुंबामध्ये आंतरजातीय विवाह केलेल्या जोडप्यांची स्वीकृती वाढली आहे असे मत व्यक्त केले. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रामचंद्र कुलकर्णी यांनी केले. मोनिका हिरेमठ यांनी आभार मानले सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सावळा काळे, शितल कंदलगावकर, सच्चिदानंद बांगर, कमलाकर तिकटे, बसवराज जेऊरे सुरेश इटकर, नीलिमा ढाळजी, प्रशांत पवार, स्वाती गायकवाड, स्वामी बाळू बिराजदार यांनी परिश्रम केले.

# इन्स्टाग्राम रिल्स बनवणाऱ्या दोन रेल्वे पोलिसांवर निलंबनाची कारवाई

मुंबई/प्रतिनिधी



मुंबईत गणवेशात इन्स्टाग्रामवर रिल्स बनवणाऱ्या दोन रेल्वे पोलिसांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. याशिवाय आणखी दोन रेल्वे पोलिसांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. गणवेशात रिल्स बनवून समाज माध्यमांवर अपलोड केल्याप्रकरणी दोघांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. त्यात एका महिला पोलिसाचा समावेश आहे. मध्य रेल्वेअंतर्गत पोलीस ठाण्यात कार्यरत महिला पोलीस व पश्चिम रेल्वेअंतर्गत पोलीस ठाण्यात कार्यरत एक पोलीस शिपाई यांनी नुकतीच गणवेशात चित्रफीत तयार करून ती समाज माध्यमांवर अपलोड केली होती. त्याबाबतची माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांना समजल्यानंतर त्यांनी उपायुक्त दर्जाच्या अधिकाऱ्यांना विभागीय चौकशी करण्याचे निर्देश दिले होते. त्यामुळे चौकशी सुरू असेपर्यंत या दोनही पोलिसांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. वरिष्ठ अधिकाऱ्याने या वृत्ताला दुजोरा दिला आहे. गणवेशातील व्यक्तीने शिस्तीचे पालन करण्याची आवश्यकता ...पान ६ वर

# वसईला येण्याचा मार्ग खडतर; केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची कबुली

वसई/प्रतिनिधी



वसई विरारला येण्याच्या मार्ग खडतर असल्याची कबुली केंद्रीय रस्ते वाहतून मंत्री नितीन गडकरी यांनी दिली. मुंबई-अहमदाबाद महामार्गावर होणाऱ्या अपघातांमुळे या महामार्गाचे नाव मी 'डेथ ट्रॅप' ठेवले होते, असेही ते म्हणाले. त्यामुळे येत्या एक महिन्यात १२१ किलोमीटरचा मुंबई-अहमदाबाद महामार्ग सिमेंट काँक्रीट करण्याचे काम सुरू केले जाईल, अशी घोषणा त्यांनी केली. विरारमध्ये आयोजित कार्यक्रमात त्यांनी ही माहिती दिली. वसई जनता बँकेच्या सुवर्ण महोत्सवी सांगता समारंभ कार्यक्रमासाठी शुक्रवारी नितीन गडकरी विरारमध्ये आले होते. यावेळी भाजप कार्यकर्त्यांशी देखील त्यांनी संवाद साधला. मुंबई अहमदाबाद महामार्ग हा जेव्हा बांधला तेव्हापासून येथे प्रचंड अपघात होत आहेत, त्यामुळे या रस्त्याचं नाव मी डेथ ट्रॅप ठेवलं होतं. इथे खूप अपघात होतात. आता देखील या रस्त्यावरून येताना प्रवास किती कठीण आहे हे समजलं. यासाठी १२१ किलोमीटर लांबीचा मुंबई अहमदाबाद महामार्ग सिमेंटचा बनवला जाईल, अशी घोषणा गडकरी यांनी केली. आजपासून येत्या एक महिन्यात हे काम सुरू केले जाईल, या महामार्गावर तीन अंडरपास असून दहा फूट ओव्हर ब्रिज बनवले जाणार आहेत. या कामाचा खर्च ६०० कोटी रुपये एवढा आहे. प्रस्तावित दिल्ली मुंबई महामार्ग देखील वसईशी जोडला जाणार असल्याची घोषणा त्यांनी केली. यामुळे वसईकराना थेट मुंबईत जाता येईल, असे त्यांनी सांगितले.

## केंद्रीय मंत्री नितीन गडकरींना काळे झेंडे दाखवणारे आगरी सेनेचे कार्यकर्ते ताब्यात



केंद्रीय मंत्री नितीन गडकरी हे शुक्रवारी विरार येथे बँकेच्या कार्यक्रमासाठी येत असताना आगरी सेनेतर्फे त्यांना काळे झेंडे दाखविण्यात आले. या प्रकरणी विरार पोलिसांनी दोन कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले आहे. वसई विरार शहराला सुर्या प्रकल्पाचे पाणी दिले जात नसल्याच्या निषेधार्थ हे काळे झेंडे दाखविण्यात आले. वसई जनता बँकेच्या सुवर्णमहोत्सवी कार्यक्रमाच्या सांगता समारंभासाठी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी शुक्रवारी वसईत आले होते. सध्या वसई विरारचा पाणी प्रश्न पेटला असून दुसरीकडे मराठा आरक्षणाचा प्रश्नही पेटला आहे. या पार्श्वभूमीवर पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. मात्र सकाळी उड्डाणपूलाजवळ येताच आगरी सेनेच्या कार्यकर्त्यांनी त्यांना काळे झेंडे दाखवून निषेध केला. यामुळे एकच गोंधळ उडाला. विरार पोलिसांनी या प्रकरणी दोन कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले आहे. सूर्या प्रकल्पाचे काम पुर्ण होऊन तीन महिने झाले आहेत. तरी देखील पाणी देण्यात आलेले नाही. राजकीय श्रेय घेण्यासाठी उद्घटन रखडवून ठेवले आहे. त्याचा निषेध करण्यासाठी आम्ही हे आंदोलन केल्याची माहिती आगरी सेनेचे अध्यक्ष कैलास पाटील यांनी दिली. वसई जनता बँक ही संघाची होती. तरी देखील नितीन गडकरी हे बविआचे आमदार हितेंद्र ठाकूर यांच्यासोबत एका मंचावर आले. त्यामुळे कार्यकर्त्यांचे खच्चीकरण होत असल्याचेही त्यांनी सांगितले.

# वसई-विरार महापालिका कर्मचाऱ्यांना यंदा मिळणार १५ हजार रुपये बोनस

विरार/प्रतिनिधी

वसई-विरार पालिकेने ३५७० कर्मचाऱ्यांना यंदा १५ हजार रुपयांचे सानुग्रह अनुदान देण्यास मान्यता दिली आहे. मागील वर्षी हे अनुदान १२,१९० रुपये होते. या वर्षी यात भरघोस वाढ करण्यात आलेली आहे. विशेष म्हणजे ज्या कर्मचाऱ्यांना खर्चाकरिता आगाऊ रक्कम हवी असेल; त्यांना १२,५०० रुपये इतकी रक्कम अर्ज केल्यानंतर देण्यास मान्यता देण्यात आली आहे. सानुग्रह अनुदानाची ही रक्कम ३ नोव्हेंबरपर्यंत कर्मचाऱ्यांच्या खात्यात जमा करण्याचे निर्देश आयुक्त अनिलकुमार पवार यांनी दिले आहेत. यासोबतच दिव्यांग-अपंग, ज्येष्ठ नागरिक, क्रीडापटू यांचे थकित मानधन आणि सफाई कर्मचारी व पालिकेचे अन्य ठेकेदार यांची बिले अदा करून आयुक्त अनिलकुमार पवार यांनी त्यांचीही दिवाळी गोड केली आहे. वसई-विरार शहर महापालिकेच्या आस्थापनेवर तात्कालीन नगरपरिषदेतील ८०७ व तत्कालिन ग्रामपंचायतीमधील ४०८ अशा एकूण १२१५ कर्मचाऱ्यांची आस्थापना आहे. तसेच महापालिकेचा सुधारित आकृतीबंध ९ सप्टेंबर २०१४ रोजी मंजूर झाला आहे. त्यात २८५२ पदांना मंजुरी देण्यात

## दिव्यांग-अपंग, ज्येष्ठ नागरिक, क्रीडापटू यांच्या चेहऱ्यावरही आनंद




आलेली आहे. मागील दोन वर्षे या कर्मचारी-कामगारांना १२,१९० रुपये इतके सानुग्रह अनुदान जाहीर करण्यात आले होते. यात या वर्षी तीन हजार रुपयांची वाढ करण्यात आली आहे. वसई-विरार महापालिकेच्या आरोग्य विभागात कंत्राटी पद्धतीवर असलेल्या कर्मचारी-कामगारांनाही ३ नोव्हेंबरपर्यंत त्यांचा पगार देण्याच्या सूचना करण्यात आलेल्या आहेत. महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागात ठेका पद्धीवर असलेल्या साफसफाई कर्मचाऱ्यांनाही बोनस मिळावा म्हणून ठेकेदारांना १३ कोटी ६८ लाख रुपये इतकी रक्कम अदा करण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले आहेत. त्यामुळे सफाई कर्मचाऱ्यांनाही १५,९०० रुपये इतका बोनस मिळणार आहे. २०२२-२३ च्या सुरक्षा अनामत (८.३३ टक्के) रकमेतून ही रक्कम ठेकेदारांना वळती करण्यात आली असल्याची माहिती आयुक्त अनिलकुमार पवार यांनी दिली आहे.

याशिवाय महापालिकेच्या माता बालसंगोपन केंद्र, बेघर निवारा केंद्रात दिवाळी व भाऊबिज या दिवशी फराळ वाटप करून त्यांचा आनंद द्विगुणित करण्यात येणार आहे. महापालिकेकडून दिव्यांग-अपंग व्यक्ती, ज्येष्ठ नागरिक, क्रीडापटू यांना प्रभाग समितीनिहाय अनुदान दिले जाते. या व्यक्तींना हे अनुदान प्राप्त व्हावे, याकरता शुक्रवार, ३ ते रविवार, ५ नोव्हेंबर या काळात सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळात कॅम्पचे आयोजन करण्यात आले आहे. या माध्यमातून या सर्वांना हे अनुदान देण्याच्या सूचना आहेत. ६ नोव्हेंबरपर्यंत हे अनुदान त्यांना देण्याचे ...पान ६ वर

# कोकण पदवीधर मतदारसंघ निवडणूक पदवीधरांना नाव नोंदणीसाठी वसई तहसिलदार यांचे आवाहन!

वसई/प्रतिनिधी



कोकण पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी मतदारयाद्या प्रसिद्ध करण्यापूर्वी नवीन पदवीधर मतदारांच्या नोंदणीचे काम सुरू आहे. या पार्श्वभूमीवर नव्या पदवीधर मतदारांना आपले नाव तात्काळ वसईच्या तहसिलदार कार्यालयात नोंदवण्याचे आवाहन तहसीलदार अविनाश कोष्टी यांनी केले आहे. निवडणूक आयोगाकडून दि. १ नोव्हेंबर २०२३ अर्हता दिनांकावर आधारीत कोकण विभाग पदवीधर मतदारसंघाच्या मतदार याद्या करण्याबाबतचा कार्यक्रम, मतदार नोंदणी अधिनियम, १९६० मधील नियम, ३१ (३) अन्वये जाहीर सूचना दिनांक ३० सप्टेंबर २०२३ रोजी प्रसिद्धी करण्यात आलेली आहे. तसेच मतदान नोंदणी नियम १९६० मधील नियम ३१ (४) अन्वये नोटीसीची प्रथम पूर्नप्रसिद्धी १६ ऑक्टोबर २०२३ रोजी करण्यात आलेली असून दिनांक २५ ऑक्टोबर, २०२३ रोजी द्वितीय पुर्नप्रसिद्धी करण्यात आलेली आहे. या धर्तीवर आगामी कोकण पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी नव्याने मतदारयाद्या तयार करण्याचे काम सुरू आहे. सध्या वसईच्या तहसिलदार कार्यालयात नव पदवीधर मतदारांची निवडणुकीसाठी मतदार नोंदणी सुरू आहे. दरम्यान, वसईतील सर्व पदवीधर मतदारांनी विहित मुदतीत ६ नोव्हेंबरपर्यंत नव्याने अर्ज सादर करण्याचे आवाहन वसईचे तहसिलदार अविनाश कोष्टी यांनी केले आहे.

# पालघर झिडके येथे सम्यक धम्मसंस्कार केंद्राचे उद्घाटन



वाडा/प्रतिनिधी

भारतीय बौद्ध महासभा पालघर जिल्हा शाखेचे माजी अध्यक्ष व विद्यमान कोषाध्यक्ष वसंत गायकवाड यांच्या संकल्पनेतून व आयोजनातून झिडके येथील राज-वैभव निवासस्थान, छत्रपती शिवाजी महाराज नगर, येथे सम्यक धम्मसंस्कार केंद्राचे उद्घाटन सेवानिवृत्त उपजिल्हाधिकारी ना.पां.जाधव यांच्या हस्ते व भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय सचिव बी.एच.गायकवाड गुरुजी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले. शनिवारी(दि.२८) आयोजित उदघाटन सोहळ्यास भारतीय बौद्ध महासभा पालघर जिल्हाध्यक्ष आद. किरण गायकवाड गुरुजी व पालघर जिल्हा, वाडा तालुका, डहाणू तालुका, मोखाडा तालुका, पालघर जिल्हा महिला शाखेच्या पदाधिकारी, विविध सामाजिक कार्यकर्ते, भिवंडी तालुक्यातील धम्म बांधव-भगिनी व धम्मप्रचारक आदी उपस्थित होते.

# दिवाळीनंतर पुन्हा सकल मराठा समाजाचे साखळी उपोषण सुरू होणार; तूर्तास साखळी उपोषण मागे

औसा/प्रतिनिधी

औसा शहरात तालुक्यातील समस्त मराठा बांधवांच्या वतीने नऊ दिवसापासून सुरू असलेले साखळी उपोषण स्थगित करीत असल्याची माहिती मराठा समाजाच्या वतीने देण्यात आली दि ३ रोजी येथील उपोषण स्थळी औसा मराठा समाजाचे अध्यक्ष प्रदीप मोरे व उपाध्यक्ष गोपाळ धानुरे यांनी व बांधवांनी पत्रकार परिषद घेऊन माहिती दिली. मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील हे आमरण उपोषनास बसले होतेमराठा समाजाला आरक्षण द्यावे याकरिता शहरात तालुक्यातील सकल मराठा समाजाच्या वतीने पाठिबा म्हणून नऊ दिवस झाले साखळी उपोषण सुरू होते. दरम्यान गुरुवारी रात्री मराठा योद्धा मनोज जरांगे यांनी दि २४ डिसेंबर २०२३ पर्यंत सरकारला मराठा समाजाला सरसगट आरक्षण देण्यासाठी वेळ आहे या दरम्यान आरक्षण नाही मिळाले तर मोठे आंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे दरम्यान



आमरण उपोषण मागे घेऊन गावोगाव साखळी उपोषण सुरू ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला होता. मात्र औसा तालुक्यातील मराठा बांधवांनी सध्या दिवाळी तोंडावर असल्याने दिवाळी होईपर्यंत साखळी उपोषण स्थगिती करून दिवाळी झाल्या नंतर तातडीने हे साखळी उपोषण सुरू होणार असल्याचे सांगितले ग्रामीण भागात ही अनेक ठिकाणी सुरू असलेली उपोषण मागे घेण्यात आली आहेत असे ही मराठा समाजाचे अध्यक्ष प्रदीप मोरे, व गोपाळ धानुरे यांनी सांगितले यावेळी नागेश मूगंळे, अँड श्याम मोरे, भरत सूर्यवंशी, पुरुषोत्तम नलगे, श्याम भोसले, विश्वास औटी, वैजनाथ सूर्यवंशी, धनराज गोमदे, बाबा थोरात, अशोक नाईकवाडे, नितीन शिंदे, गणेश गायकवाड, बाळु नरवडे, गुणाजी पवार, बालाजी सुर्यवंशी, गजानन शिंदे, विपुल पाटील, लक्ष्मण मुगळे, कैलास थोरात, संतोष खंडागळे, नवनाथ जाधव, दुर्गेश ताकभाते, महादेव जोगदंड, आकाश पाटील, बालाजी जाधव, गोविंद खंडागळे, संभाजी औटी, अक्षय नरवडे, इश्वर ढोक, व सर्व मराठा समाज बांधव होते.

# एमएमआरडी आयुक्तांकडे वसई-विरारच्या वाढीव पाणी योजनेकरिता आ.क्षितीज ठाकूर यांची मागणी

विरार/प्रतिनिधी



आश्वासने देऊनही राज्य शासनाकडून एमएमआरडी मार्फत वसई-विरारला मिळणारे वाढीव पाणी गेले तीन चार महिने देण्यात आलेले नाही. वसईला अपुऱ्या पाण्याचा तुटवडा जाणवत असताना नालासोपाऱ्याचे आमदार क्षितीज ठाकूर यांनी बहुजन विकास आघाडीच्या शिष्ट मंडळासह एमएमआरडीएचे आयुक्त डॉ.संजय मुखर्जी यांची भेट घेतली. वाढीव १८५ एमएलडी पाणी वसई विरारला जुलै महिन्यात मिळायला हवे होते. इतर खासदार व छोट्या-मोठ्या कार्यकर्त्यांनी व राजकीय पक्षांनी या पाण्यासाठी मोर्चे व अन्य मार्गाने शासनाकडे आग्रही मागणी सुरु केली होती. वसईतील मागील सत्ताधारी बहुजन विकास आघाडीने देखील आपली मागणी आता पुढे रेटली आहे. आयुक्त डॉ.संजय मुखर्जी यांनी एमएमआरडीमार्फत सूर्या धरणातून ४०३ दशलक्ष लिटर्स पाणी पुरवठा नव्या शहरांना केला जातो. वसई विरार पालिकेला १४२ दशलक्ष लिटर्स वाढीव पाणी पुरविण्यात यावे, अशी मागणी आ.क्षितीज ठाकूर यांनी केली. त्यांच्यासोबत माजी महापौर नारायण मानकर, प्रविण शेट्टी, बविआ नेते रमेश कोटी यावेळी उपस्थित होते. वसई-विरार पालिकेला २३० एमएलडी पाणी पुरवठा सूर्या, धामणी व पेल्हार, ऊसगाव या धरणातून ...पान ६ वर